रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४७ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in



हजारो महिलांच्या डोक्यावरील हंडा ‘जलजीवन’मुळे उतरणार

पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ रविवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

## तळवडे जलपाडा येथील फटाका गोदाम भस्मसात

### सुदैवाने जीवितहानी नाही

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

तालुक्यातील तळवडे-जलपाडा येथील फटाक्यांच्या गोदामाला आकस्मिक आग लागून सदर गोदाम भस्मसात झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. या गोदामात पोयनाड पोलिसांनी दिवाळीदरम्यान कारवाई केलेल्या फटाक्यांचा माल सील करुन ठेवला होता. या गोदामात विजेची जोडणीदेखील नसल्याने ही आग कशामुळे याबाबत शोध सुरु आहे. सदर माल सुमारे ४० हजार रुपयांचा असल्याचे सांगण्यात आले. अलिबाग नगरपरिषद, तसेच




आरसीएफ थळ येथील अग्नीशमन दलाने घटनास्थळी दाखल होऊन सदर आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणीही जखमी वा दगावलेला नाही.

तालुक्यातील फटाके विक्रेते शिंदे यांच्या गोदामामध्ये दिवाळीच्या कालावधीत सुतळी बॉम्ब पोयनाड पोलिसांनी जप्त केले होते. पान २ वर

## राहुल बजाज यांचे निधन

। पुणे । वृत्तसंस्था ।

प्रसिद्ध उद्योगपती आणि बजाज समूहाचे अध्यक्ष राहुल बजाज यांचे शनिवारी



निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. राहुल बजाज हे १९६८ मध्ये बजाज ऑटोमध्ये कार्यकारी अधिकारी पदावर रुजू झाले होते. राहुल बजाज यांचा जन्म १० जून १९३८ साली झाला होता. पद्मभूषण पुरस्काराने त्यांना गौरविले होते.

# महामानवाचे आंबवडे देशासाठी स्फूर्तीभूमी

। संतोष पिळके ।

। चिपळूण ।

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव असलेले आंबवडे येथील स्मारक हे तीर्थस्थळ म्हणून विकसित करावे आणि या गावाचे स्फूर्तीभूमी असे नामकरण करावे, अशी सूचना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शनिवारी आंबवडे ,ता. मंडणगड येथे केले.**

### राष्ट्रपती कोविंद यांचे प्रशंसोद्गार



मंडणगड तालुक्यातील डॉ. आंबेडकर यांच्या मूळ गाव असलेल्या आंबडवे येथे राष्ट्रपती कोविंद यांनी सपत्नीक भेट देऊन आदरांजली अर्पण केली. राष्ट्रपती कोविंद पुढे म्हणाले की, ६ डिसेंबर हा डॉ. आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरा केला जातो. २०१५ सालापासून २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जात आहे. १४ एप्रिल रोजी बाबासाहेबांची जयंती सर्वत्र साजरी होते. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. कारण, याच दिवशी १९०० साली पान २ वर

> *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिक्षणाबाबतची ओढ आणि निष्ठेचे आजच्या युगात स्मरण करण्यासाठी ७ नोव्हेंबर हा राष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा करावा.*
>
> *– रामनाथ कोविंद, राष्ट्रपती*

## जेएसडब्ल्यूच्या विरोधात कारवाईस टाळाटाळ

### माजी आमदार पंडित पाटील यांचा आरोप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीकडून वायू प्रदूषणासोबत आता नव्यानेच सुरु केलेल्या ध्वनी प्रदूषणाविरोधात शेकाप नेते माजी आमदार पंडित पाटील यांनी पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोयनाड पोलिसांनी सदर तक्रार पेण पोलीस ठाण्याकडे वर्ग केली. मात्र, आठ दिवस उलटून गेल्यानंतरही पोलीस प्रशासनाकडून ना गुन्हा दाखल करण्यात आला की, कोणती कारवाई, त्यामुळे नाराजी व्यक्त करीत पंडित



पाटील यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत शंका व्यक्त केली आहे.

दरम्यान, यासंदर्भात पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्याशी संपर्क साधला असता पान २ वर

## अज्ञातांकडून तरुणावर गोळीबार

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव शहरात कचेरी रोड मार्गावर शनिवार १२ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १२.१० वाजण्याच्या सुमारास काळ्या रंगाच्या मोटार सायकलवरून आलेल्या दोघा अज्ञात इसमांनी आपले सोनी मेडिकलचे दुकान पान २ वर

## काशीद येथे अज्ञाताचा खून

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

काशीद येथील रत्नाकर महाबळ रॉय यांच्या मालकीच्या मिळकतीत एका विहिरीमध्ये ४० वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. याबाबतची प्रथम माहिती काशीद गावच्या पोलीस पाटील समृध्दी राणे यांनी मुरुड पोलिसांना देताच मुरुड पोलीस काशीद येथे पोहचून सदरचा मृतदेह विहिरीतून काढण्यात येऊन त्याचे शवविच्छेदन करण्यासाठी मुरुड ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

सदरची विहीर काशीद गावापासून दूर व एकांतात आहे. या ठिकाणी अनेक पर्यटक येत असून, आलेल्या पान २ वर




## रोह्यात जमीन घोटाळा उघड

### सहा जणांवर गुन्हा

### दलालांचे धाबे दणाणले

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यात बल्क ड्रग्ज फार्मा पार्कला शेतकऱ्यांचा विरोध असतानाही शासनाकडून जमीन संपादन सक्तीने लादण्याचे काम होत आहे. गावा-गावातील दलाल लॉबीमुळे गावामध्ये शेतकऱ्यांची फसवणूक व जमिनीचे गैरव्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असतानाच, रोहा तालुक्यातील तलाठी सजा कोकबन विभागात आणखीन एक जमीन घोटाळा प्रकरण समोर आला आहे.

फिर्यादी गणेश कोल्हटकर यांचे पणजोबा कै. हशा नागू कोल्हटकर हे सन १९७५ साली मृत्यू पावले असताना, २०११ पान २ वर

## रायगड जिल्ह्यात कोट्यवधींची फसवणूक

॥ गुन्हा दाखल करण्याऐवजी कोर्टात जा; पोलिसांचा अजब सल्ला

॥ डॉ. प्रमोद म्हात्रे यांचा आरोप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करुन दरमहा ठराविक रक्कम देण्याचे आमिष दाखवून रायगड जिल्ह्यात कोट्यवधींची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पान २ वर






# अधिपरिचारीकांवरील अन्याय सहन करणार नाही

## समाजक्रांती आघाडीचा इशारा



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

प्रशिक्षणानंतर अधिपरिचारीकांना नियुक्ती ने देण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात समाजक्रांती आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. या अधिपरिचारीकांना नियुक्ती न दिल्यास धरणे आणि त्यानंतर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समाज क्रांती आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष बी. जी. पाटील यांनी दिला आहे. अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी हा इशारा दिला. यावेळी समाजक्रांती आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह अधिपरिचारीकां तसेच पालक उपस्थित होते. प्रशिक्षण सुरु असतानाही कोरोना काळात रुग्ण सेवा करणाऱ्या जिल्ह्यातील १५ अधिपरिचारीकांना प्रशिक्षण पूर्ण होऊन १२ हून अधिक महिन्यांचा कालावधी झाला आहे. त्यांना अजूनही १८ महिन्यांची नियुक्ती मिळाली नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ ओढवली आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे त्यांना १८ महिन्यांचे नियुक्तीचे आदेश देण्याची मागणी करत हल्लाबोल धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत शासनाला देण्यात आलेल्या निवेदना म्हटले आहे की, अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात ऑगस्ट २०१७ पासून जीएनएम प्रशिक्षणास १५ विद्यार्थ्यांनी सुरुवात करुन २०१९-२० मध्ये आपले प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केले. त्यानंतर उत्तीर्ण झालेल्या बंधपात्र अधिपरिचारीका यांना संबंधीत आरोग्य अधिकारी व कार्यालय येथे वारंवार भेट देऊन अर्ज विनंत्या करुन सुद्धा नियमाप्रमाणे १८ महिन्यांचे नियुक्ती आदेश मिळत नाहीत. जिल्ह्याच्या मेरिटलिस्टमध्ये येऊन सदर प्रशिक्षणासाठी आमची निवड झाली आहे. मेहनत घेऊन अभ्यास करुन आम्ही उत्तीर्ण झालो आहेत. परंतु आज आम्ही बेरोजगार आहोत. प्रशिक्षण चालु असताना सुद्धा कोरोना महामारीच्या आपत्तीत देखील आम्ही रुग्णसेवेचे काम केले आहे. मात्रा आता नियुक्ती मिळत नसल्याने आम्ही आर्थिक व मानसिक तणावात आहोत. त्यामुळे नाईलाजाने आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १५ फेब्रुवारी पासून हल्ला बोल धरणे आंदोलन करण्याची वेळ ओढवली आहे. त्यामुळे आम्च्या मागण्या शासनाने त्वरीत पुर्ण करुन सदर आंदोलनाची वेळ आणू नये असे आवाहन या परिचारीकांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### दुचाकीस्वाराचा नदीत पडून मृत्यु

। खोपोली। प्रतिनिधी ।

खरीवली येथे आलेला अविनाश वाघ सकाळी जात असताना पुलावर संरक्षणकठडे नसल्याचा अंदाज न आल्याने पुलावरून दुचाकीसह कोसळल्याने जागीच मृत्यु झाला.

१२ फेब्रुवारी रोजी सकाळच्या दरम्यान घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पुलावर संरक्षण कठडे नसल्यामुळे तरूणाला जीव गमवावा लागला असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी पीडब्ल्यूडी विरोधात संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार अविनाश वाघ (खरबाची वाडी,वरसई) हा तरूण इंडोस स्पेस कंपनीत नोकरीला आहे. कंपनीतील मित्रांसमवेत खरीवली येथे पोपटीसाठी शुक्रवार दि.११ फेब्रुवारीला आला होता.

यादरम्यान स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी पोहचून मदतंकार्य करण्याचे काम केले. खरीवली गावचा रस्ता अरूंद असल्यामुळे वाहने ये-जा करताना त्रास होत असून पुलावर संरक्षण कठडे नसल्यामुळे तरूणाला जीव गमवावा लागला असून पुलावर तातडीने संरक्षण कठडे बसविण्यासाची मागणी खरीवली येथील ग्रामस्थ,शेतकरी संघर्ष समितीचे शांताराम पाटील यांनी पीडब्ल्यूडीचे अभियंता परदेशी यांच्याकडे केली.

# हिजाबविरोधी सोगाव मुस्लिमबांधवानी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

। अलिबाग । वार्ताहर ।

कर्नाटक राज्यातील समाजकंटकांनी तेथील महाविद्यालयामध्ये हिजाबवर बंदी घालण्याची मागणी करत धुडगूस घातल्यामुळे मुस्लिम धर्मातील मुली व महिलांनी संताप व्यक्त करत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात आंदोलन करत निषेध नोंदवून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

अलिबाग तालुक्यातील सोगांव मुस्लिम समाजातर्फे जमातुल् मुस्लिमिन सोगांव ट्रस्टचे अध्यक्ष वस्सीम कुर यांनी हिजाब प्रकरणात कर्नाटक राज्यातील

समाजकंटकांविरोधात जिल्हाधिकारी रायगड यांना निवेदन देत निषेध नोंदवला आहे. याबाबतीत अधिक माहिती देतांना कुर यांनी सांगितले की, मुस्लिम धर्मात महिला व मुली हिजाब, बुरखा,नकाब आदी परंपरागत वस्त्रे परिधान करतात. तो आमचा सामाजिक हक्क आहे, आम्ही ते परिधान करणारच, त्याला विरोध करण्याचा कोणालाही अधिकार नाही आहे. हिजाबला विरोध करत कर्नाटकातील महाविद्यालयामध्ये घुसून काही समाजकंटक मुस्लिम विद्यार्थिनींना हिजाब, बुरखा परिधान करू नको, असे विरोध करत नाहकचा त्रास देत त्या मुलीचा व्हिडीओ काढून सोशल मीडियावर व्हायरल केला आहे. त्यामुळे आम्हा नागरिकांच्या व महिलांच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. अशा कृत्यांमुळे दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा कुटील डाव चालू आहे. यावर कर्नाटक सरकारने त्या समाजकंटकांवर तातडीने गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

# डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे अलिबागमध्ये व्याख्यान

।अलिबाग। विशेष प्रतिनिधी ।

सहयोग पतसंस्थेच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त बँकिंग विथ थिंकिंग या आर्थिक स्तरावर जागृती करण्याचे उद्देशाने सहयोग पतसंस्था गेली पाच वर्ष नामवंत अर्थतज्ञ असलेल्या वक्त्यांची व्याख्यानमाला आयोजित करीत असते.

सहयोग पतसंस्थेच्या साजरा होणाऱ्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त १५ फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मेघा चित्र मंदिर हॉल, चेंढरे-अलिबाग येथे मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू, नियोजन आयोगाचे माजी सदस्य, तथा माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर हे उपस्थित राहून भारतीय विद्यमान अर्थव्यवस्था या विषयावर संबोधित करणार आहेत.

सहयोग पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण सहयोग पतसंस्था अलिबागचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी वर्ग व पिग्मी प्रतिनिधी यांचे वतीने केले आहे.

# स्मशानभूमीचे सुशोभिकरण

। उरण । वार्ताहर ।

महाराष्ट्र नवनिर्माण सेना शाखा नविन शेवा यांच्या संकल्पनेतून नविन शेवा स्मशानभूमी समोर सुशोभिकरण करण्यात आले. यामध्ये नागरीकांना बसण्यासाठी बँचेस पाण्याची टाकी लाऊन पाण्याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. प्रसंगी कमळाकर पाटील,हेमंत म्हात्रे,मनोहर सुतार व ग्रामस्थ उपस्थित होते.या सामाजिक उपक्रमाला जनतेचाही नेहमी उत्तम प्रतिसाद लाभत असतो.मनसेने केलेल्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिवसेनेचा कौस्तुभ बुटाला घणाघात



। खेड । अजित जाधव ।

कौस्तुभ बुटाला शहरात घेऊन फिरलेली घंटा भ्रष्टाचाऱ्यांच्या गळ्यात बांधणार का? असा सवाल शिवसेना शहर प्रमुख निकेतन पाटणे यांनी शुक्रवारी दि ११ रोजी पत्रकार परिषदेत यांना विचारला आहे. उद्योजक कौस्तुभ बुटाला यांनी खेडमध्ये शिवसेना विकास कामाला विरोध करत असल्याचा आरोप करत घंटानाद आंदोलन केले होते. या आंदोलनावर आज शहर शिवसेनेने घणाघाती टीका केली आहे.

शहर शिवसेना प्रमुख निकेतन पाटणे म्हणाले, स्वयंघोषित समाजसेवक कौस्तुभ बुटाला यांनी नुकतीच पत्रकार परिषद घेऊन स्वच्छ खेड, सुंदर खेड, शहर विकास आदी मुद्दे पुढे करत घंटानाद आंदोलन केले. मात्र हे आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित होते हे प्रत्यक्ष त्यांच्यासोबत या आंदोलनात भ्रष्टाचाराचे मूळ असलेले माजी नगराध्यक्ष सहभागी झाल्याने उघड झाले. आंदोलनात भ्रष्टाचार मुक्त शहराचे नारे दिले जात असताना विरोधाभास हा होता की जे त्यांच्या सोबत होते त्याच्यावरच भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झालेले आहेत. बुटाला नक्की काय करतात? कामे कशी घेता ते त्यांनी खेडवासीयांनी सांगावे. असा टोला श्री पाटणे यांनी लगावला आहे. राजकीय हट्टापायी नगरपरिषदेची तिजोरी रिकामी करण्याचा प्रताप करणाऱ्या भ्रष्टाचाऱ्यांच्या गळ्यात कौस्तुभ बुटाला घंटा बांधणार का? असा सवाल पाटणे यांनी उपस्थित केला. यावेळी माजी नगराध्यक्ष अरविंद तोडकरी, सुनील दरेकर, कुंदन सातपुते, मिनार चिखले, सीमा वंडकर, प्रशांत कदम, प्रेमल चिखले, दीपक नलावडे, जावेद चौगुले आदी उपस्थित होते.

# वणवा मुक्त कोंकणतर्फे जनजागृती

। चिपळूण । वार्ताहर ।

चिपळूण येथील ‘वणवा मुक्त कोंकण’ने गतवर्षी सुरु केलेल्या वणवा मुक्तीच्या या चळवळीत कोरोना संकटकाळ असतानाही तालुक्यातील सोळा गावांनी उत्तम कार्य केले आहे. त्यामुळे वणवे लावण्याचे काही प्रकार रोखण्यातही यश आले आहे.

अशा गावांचा आणि वणवा मुक्तीसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा पुरस्कार प्रदान सोहळा १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी सभागृहात संपन्न होणार आहे. कोकणातील वाढत्या वणव्यांना रोखण्यासाठी येथील सह्याद्री निसर्ग मित्र या पर्यावरण विषयात काम करणाऱ्या संस्थेने वणवा मुक्त कोंकण समितीची स्थापना करून वणव्यांविषयी जनजागृती चळवळ उभारण्यास सुरुवात केली आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आ. शेखर निकम असतील तर रिया कांबळे, प्रतापराव शिंदे, गटविकास अधिकारी प्रशांत राऊत, प्रभारी गटविकास अधिकारी भोसले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहाणार आहेत. या कार्यक्रमास तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे प्रमुख पदाधिकारी, नेते उपस्थित राहाणार आहेत. या सोहळ्यास सर्व ग्रामस्थ, निसर्गप्रेमींनी उपस्थित राहून वणवा मुक्तीसाठी पाठबळ द्यावे असे आवाहन समितीचे अध्यक्ष श्रीराम रेडीज, बापू काणे, भाऊ काटदरे यांनी केले आहे.

# विलनीकरणाचा अहवाल न्यायालयाकडे सूपूर्द

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारताचे

एसटी विलनीकरणाचा अहवाल न्यायालयाकडे सूपूर्द

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मागील तीन महिन्यांपासून सुरू असणाऱ्या एसटी संपाबाबत अंतिम निर्णय येण्याची शक्यता वाढली आहे. राज्यभरातील एसटी कर्मचारी संघटनांचे प्रमुख मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. राज्य सरकारने कर्मचाऱ्यांच्या विलनीकरणाला नकार दिल्यानंतर संप चिघळण्याची शक्यता होती. मात्र, राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना जवळपास ४१ टक्क्यांची पगारवाढ देऊन नोकरीत पुन्हा रूजू होण्यासाठी आवाहन केले. त्यानंतरही काही संघटना संपावर ठाम आहेत. यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याने संप चालू ठेवायचा,



की मागे घ्यायचा यावर मोठा निर्णय येणे अपेक्षित होता. दरम्यान, एसटी महामंडळचा राज्य सरकारमध्ये विलीनीकरण संदर्भात त्रिसदस्यीय समितीचा अहवाल रात्री उशिरा मुंबई हायकोर्टात सादर करण्यात आला. यासंदर्भात राज्य सरकारचे वकील पिंकी भन्साली यांनी माहिती दिली. शुक्रवारी मुंबई हायकोर्टात झालेल्या सुनावणी दरम्यान राज्य सरकारने अहवाल सादर करण्यासाठी वेळ वाढवून मागितला होता. कोर्टाने १८ फेब्रुवारी पर्यंत वेळ वाढवूनही दिला होता. मात्र काल उशिरा अहवाल प्राप्त झाल्याने राज्य सरकारतर्फे मुंबई हायकोर्ट रजिस्ट्रारकडे बंद लिफाफ्यात सादर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या संपूर्ण प्रकरणावरल पुढील सुना-वणी २२ फेब्रुवारीला होणार आहे.

# उरण बाजारपेठेत कलिंगड दाखल

। चिरनेर । वार्ताहर ।

उन्हाचा तडाखा वाढण्यापूर्वी उरण बाजारात रोह्याचे गोल्डन शुगर गारेगार कलिंगड दाखल झाले असून नागरिक कलिंगड करतांना दिसत आहेत .

कलिंगडाच्या हंगामाची सुरुवात जानेवारी महिन्यात होते. जून महिन्या पर्यंत हा हंगाम सुरु असतो. अवकाळी पावसामुळे यंदा कलिंगडाचा हंगाम काहीसा लांबणीवर पडला. त्यामुळे पुढील आठवड्यात कलिंगडाची आवक आणखी वाढेल. उन्हाळ्यात मागणी वाढत आहे. कलिंगडच्या आकारावरून किंमत ठरविली जाते. लहानांत लहान १०० रुपये तर मोठे आकाराचे २१० रुपये अशा भावाने विक्री केली जाते.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कावीर ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक १)तनया प्रताप गंभीर २)श्रीमती.शिल्पा प्रताप गंभीर यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र आर.चौ.मी. |
|---|---|---|
| कावीर ता.अलिबाग जि.रायगड | ४८६/१/२/१ते ४८६/१/२/३२ | ९४.१०.०० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लिज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरूपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही, अगर असल्यास, तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक-१२/०२/२०२२

**ॲड.आशिष संदीप रानडे**
रा.रानडे निवास तात्या रानडे मार्ग
शिवलकर नाका अलिबाग-रायगड
मो.नंबर-९२७०२९४५४५


पान १ वरून

## महामानवाचे आंबवडे देशासाठी स्फूर्तीभूमी

बाबासाहेबांनी शाळेमध्ये प्रवेश घेऊन शिक्षणाचा श्रीगणेशा केला होता. हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून, राष्ट्रीय पातळीवरील शिक्षण विषयक ओढ आणि निष्ठेचे स्मरण करुन देण्यासाठी तो साजरा करणे आवश्यक आहे. येथे बसलेल्या संसदेतील सदस्यांनी याबाबत पुढाकार घ्यावा, मी त्यांना माझ्या परीने मदत करीन, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याशी संबधित पाच ठिकाणांना पंचतीर्थाचे नाव देऊन केंद्र सरकारने या सर्व ठिकाणी आदरांजली अर्पण करण्याची स्तुत्य पद्धत सुरु केली आहे. त्यांची जन्मभूमी, नागपूरची दीक्षाभूमी, दिल्लीचे परिनिर्वाण स्थळ, मुंबईची चैत्यभूमी आणि लंडनमधील आंबेडकर मेमोरियल होम या पाच ठिकाणी बाबासाहेबांचा आदर्श मानणारे लोक श्रध्दाजंली अर्पण करतात. त्यांनी केंद्र सरकरला अशी सूचना केली की, याच मालिकेत बाबासाहेबांचे मूळ गाव असलेल्या आंबडवे येथील स्मारकही तीर्थस्थळ म्हणून घोषित करण्यात यावे आणि या गावाचे स्फूर्तीभूमी असे नामाभिधान करण्यात यावे.

यावेळी सविता कोविंद, राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, सर्वोच्च न्यायालयाचे न्या. भूषण गवई, रत्नागिरीचे पालकमंत्री ॲड. अनिल परब, राज्यमंत्री संजय बनसोडे, जि. प. अध्यक्ष विक्रांत जाधव, खा. सुनील तटकरे, दादा इदाते हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात व सांगता पोलीस बँड पथकाने राष्ट्रगीताची धून वाजवून केली. सूत्रसंचालन निवेदक मनोज क्षीरसागर यांनी केले.

## जेएसडब्ल्यूच्या विरोधात कारवाईस टाळाटाळ

सदर तक्रार अर्जावर चौकशी सुरु असल्याचे सांगितले.

जेएसडब्ल्यु कंपनीतून मोठया प्रमाणात प्रदुषण होत आहे. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांना त्रस्त आहेत. कंपनीच्या परिसरातील गावांमध्ये प्रदुषणाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. हा त्रास सहन करत असताना मागील महिन्याभरापासून कंपनीच्या प्लांटमधून मोठा आवाज सुरु झाला आहे. या आवाजामुळे या परिसरातील नागरिकांची झोप उडाली आहे. याबाबत कंपनी प्रशासनाला विचारणा केली असता, कंपनीचे प्रशासकीय अधिकारी हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे कंपनीतुन होणारे प्रदुषण टाळण्यासाठी कंपनी प्रशासनावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी पंडित पाटील यांनी करत त्याबाबत पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यावेळी पंडित पाटील यांनी जेएसडब्ल्यू ही पोलाद निर्मितीची कंपनी असताना त्यांनी येथे ऊर्जा प्रकल्प सुरु करत आहे. यासंदर्भातील कोणती जनसुनावणी घेण्यात आली होती का? असा सवालही केला होता. जनतेला छोट्या छोट्या कारणांवरुन त्रास देणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना जेएसडब्ल्यू सारख्या कंपनीच्या प्रदुषणाबाबत का दुर्लक्ष केले जात आहे. जेएसडब्ल्यू कंपनीला लोकांच्या आरोग्याच्या जिवाशी खेळण्याचा अधिकार कोणी दिला असा सवालही पंडित पाटील यांनी केला आहे. सदर तक्रार करुन आठ दिवसांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र पोलिसांनी याबाबत काहीच कार्यवाही केलेली दिसत नाही. त्यामुळे पोलिसांची एकुणच कार्यपद्धतीबाबत पंडित पाटील यांनी शंका व्यक्त केली आहे.

## रायगड जिल्ह्यात कोट्यवधींची फसवणूक

जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केलेल्या तक्रारीनंतर सदर तक्रारीची चौकशी करण्याऐवजी अलिबाग पोलिसांनी तक्रारदारांना सदर बाब दिवाणी असल्याने तुम्ही न्यायालयात दाद मागा, असा अजब सल्ला दिल्याचा आरोप डॉ. प्रमोद म्हात्रे यांनी केला आहे.

पॅरेडीगम एज मार्केटींग सर्व्हिसेस असे या गुंतवणूकदार कंपनीचे नाव आहे. डॉ. म्हात्रे यांच्याकडे सदर कंपनीच्या कमिशन एजंट म्हणून कीर्ती सतीश अट्रावलकर यांनी गुंतवणुकीवर आर्कषक लाभ देण्याचे आमिष दाखविले. त्यानुसार सदर रक्कम करन्सीज, इक्वीटीज, कमोडीटीज मार्केटमध्ये गुंतवणूक करुन त्यावर आकर्षक अशी दर महिन्याला तीन ते चार टक्के मासिक नफ्याची रक्कम देण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यासाठी त्यांच्याकडून ५० हजार स्विकारले. तीन महिने नफ्याची रक्कम देण्यातदेखील आली. मात्र, त्यानंतर सदर रक्कम देणे बंद करण्यात आले. त्याबाबत विचारणा केली असता, पुढील महिन्यात नियमितपणे नफ्याची रक्कम देण्याचे कबूल केले. तरीदेखील सदर रक्कम देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे सदर गुंतवणुकीची मुदत संपल्यानंतरदेखील त्यापोटीचा नफा आणि मूळ रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात येऊ लागली. त्यामुळे प्रमोद म्हात्रे यांनी सदर कंपनीच्या मुंबई तसेच अलिबाग कार्यालयात नोटीसा पाठवल्या. मात्र, सदर कार्यालय बंद असल्याने या नोटीसा परत आल्या. यासंदर्भात संतोष जाधव यांनी प्रमोद म्हात्रे यांची अलिबाग येथे प्रत्यक्ष भेट घेऊन ८ दिवसात कुंदन म्हात्रे हे स्वतः येऊन मुद्दल व नफा अशी एकरकमी देतील, असे आश्वासन दिले. त्यानुसार कुंदन म्हात्रे यांनी फोनवरुन तसेच मेसेज करुन तसे आश्वासन स्वतःदेखील दिले. प्रत्यक्षात एकही रुपया दिलेला नाही. प्रत्येक वेळी टोलवाटोलवी करीत ही रक्कम देण्याचे टाळाटाळ करण्यास सुरुवात केल्याने अखेर प्रमोद म्हात्रे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार केली. त्यानुसार अधीक्षक कार्यालयाकडून सदर तक्रार अलिबाग पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आली. अलिबाग पोलिसांनी प्रमोद म्हात्रे यांना बोलावून घेतले, मात्र प्रत्यक्षात त्यांना सदर प्रकरण हे दिवाणी असल्याने आपण न्यायालयात जाऊन दाद मागा असा सल्ला दिला. त्यामुळे डॉ. म्हात्रे आश्चर्यचकित झाले. पोलिसांनी याप्रकरणी तक्रार नोंदवून घेण्याची मागणी डॉ. प्रमोद म्हात्रे यांनी केली आहे.

## रोह्यात जमीन घोटाळा उघड

मध्ये रोहा दुय्यम निबंधक कार्यालयात येथे त्यांच्या मालकी हक्काची जमीन खोटी व्यक्ती उभी करून खरेदीखत करण्यात आला. त्यामुळे फिर्यादी कोल्हटकर, रा. कोकबन यांच्या तक्रारीनंतर रोहा पोलीस ठाण्यात अखेरीस चाळीस वर्षांपूर्वी मयत व्यक्तीच्या जागी तोतया व्यक्ती उभा करून खरेदीखत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

फिर्यादीनी तक्रार नोंदवून आता पाच महिने उलटले होते. परंतु राजकीय व दलाल लॉबीमुळे गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. शेवटी सर्वहारा जनआंदोलनच्या सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडल्याने शेवटी जिल्हा पोलीस अधीक्षक दुधे यांनी याची दखल घेऊन रोहा पोलीस ठाण्यात याबाबत आदेश दिले. ६ डिसेंबर २०२२ रोजी तक्रारदार कोल्हटकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भगवान घोडे, गिरीश सिनकर, उद्देश वाडकर, पांडुरंग केमसे, एक अनोळखी व्यक्ती व तत्कालीन दुय्यम निबंधक रोहा अशा एकूण सहा व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे पूर्ण रोहा तालुक्यात खळबळ उडाली असून, असे जमिनीचे घोटाळे करणाऱ्या दलालांचे धाबे दणाणले आहेत.

## तळवडे जलपाडा येथील फटाका गोदाम भस्मसात

गेल्या अडीच महिन्यांपासून हा नाशवंत साठा गोदामातच पडून होता. शनिवारी सायंकाळी सव्वा चारच्या सुमारास अचानक गोदामामधून आवाज आला. आगीचा भडका उडू लागला होता. गोदामाच्या परिसरात असलेल्या गवतानेदेखील पेट घेतला. परिसरात असलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने एकत्र येत आपापल्या परिने आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु आगीचा भडका वाढत गेला. या घटनेची माहिती मिळताच अलिबाग नगरपरिषद कंपनीचे अग्निशमन दलाचे पथक दोन अग्निशमन बंबासह घटनास्थळी दाखल झाले. तीन वाहनांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनतर आरसीएफ थळ येथील अग्निशमन दलानेदेखील आग विझवण्यास प्रयत्न केले. अखेर तब्बल पाऊण तासानंतर आग आटोक्यात आणण्यास या यंत्रणेला यश आले. या आगीमध्ये सुमारे ४० हजार रुपये किंमतीचे नाशवंत फटाके जळून खाक झाले आहेत. ही आग नक्की कशामुळे लागली याचा तपास सुरु असल्याची माहिती पोयनाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल अतिग्रे यांनी दिली.

## अज्ञातांकडून तरुणावर गोळीबार

बंद करून चालत येणाऱ्या तरुणाला पिस्तूलातून गोळीबार करुन ठार मारण्याचा प्रयत्न केला. यानंतर हे दोघे अज्ञात इसम आपल्या मोटारसायकलवरून मुंबई - गोवा महामार्गाने इंदापूर बाजूकडे पळून गेले.

यामध्ये हा तरुण जखमी झाला असून, त्याला औषधोपचारासाठी मुंबईला हलविण्यात आले आहे. या घटनेची फिर्याद दीपक यादव (२४) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. सदर घटनेने माणगाव शहरासह सबंध रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची माहिती समजताच रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली.

सदर घटनेतील फिर्यादी दिपक यादव व जखमी तरुण शुभम जैस्वाल हे आपले सोनी मेडिकल दुकान बंद करून कचेरी रोड येथून घरी पायी चालत जात असताना शारदा स्वीट मार्टच्या समोर आल्यावेळी त्यांच्या समोरून कचेरी रोड येथून एक काळया रंगाची पल्सर मोटार सायकल या गाडीवरील अज्ञात चालक याने इंदापुरला जाणारा रस्ता कोठे आहे, असे त्यांना विचारले. तेव्हा जखमी शुभम हा त्यांना रस्ता सांगत असताना सदर अज्ञात इसमांनी संगनमत करून मोटार सायकलच्या पाठीमागे बसलेल्या अज्ञात इसमाने त्याच्या जवळील पिस्तुलची नळी यातील जखमी शुभम यांच्या पोटाच्या उजव्या बाजूस धरून त्याला ठार मारण्याचा उद्देशाने फायर करून ते मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने इंदापूर बाजूकडे पळून गेले. सदरच्या घटनेचे कारण समजले नसून माणगाव पोलीस अज्ञात आरोपी इसमांचा शोध घेत आहेत. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास जिल्हा पोलिस अधीक्षक अशोक दुधे व पोलीस निरीक्षक माणगाव आर.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. बेग हे करीत आहेत.

## काशीद येथे अज्ञाताचा खून

मित्रांमध्ये भांडण झाले असावे, अथवा सदरील इसमाचा काटा काढण्यासाठी गोड बोलून त्याला या ठिकाणी आणले असावे व त्याचा खून करण्यात आला असावा अशा अनेक शंका येथे व्यक्त करण्यात येत आहे. मृतदेहाच्या डोक्यावर गंभीर प्रहार मारल्याने मोठी जखम झाल्याचे दिसून येत आहे. तसेच त्याच्या गळ्यामध्ये सिमेंट कॉंक्रिटचा पोल बांधण्यात येऊन त्याला या विहिरीत टाकून देण्यात आले होते. सदरील इसमाचा खून करण्यात आल्याचे दिसून आल्याने मुरुड पोलिसांनी अज्ञात इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक नितीन गवारे करीत आहे.

# हजारो महिलांच्या डोक्यावरील हंडा ‘जलजीवन’मुळे उतरणार



## म्हसळ्यातील चार गावांना नळजोडण्यासाठी २ कोटी ३९ लाखांचा निधी

| उदय कळस |
| म्हसळा |

जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरापर्यंत नळजोडणीच्या माध्यमातून पाणी पोहोचविण्याचा केंद्र व राज्य शासनाचा मुख्य हेतू आहे. ‘जलजीवन’ अंतर्गत म्हसळ्यातील चार गावांना नळजोडण्यांसाठी २ कोटी ३९ लाख १ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असून, हजारो महिलांच्या डोक्यावरील हंडा कायमचा उतरणार आहे. त्यामुळे महिला वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

जल जीवन मिशन योजनेसाठी ४५ टक्के केंद्र शासन, ४५ टक्के राज्य शासन व १० टक्के स्थानिक लोकवर्गणी असे आर्थिक नियोजन असते. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागांत १ कोटी ४२ लाख ३६ हजार नळजोडण्या देण्याचे केंद्र व राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे.

म्हसळा तालुक्यातील केलेटे ग्रामपंचायतीमधील चंदनवाडी वाडीसाठी बोअरवेल, श्री एचपी पंप व नळजोडणी यासाठी २१ लाख रुपये मंजूर आहेत.

मांदाटणे योजनेमध्ये मांदाटणे, पाष्टी, पानदरे, मोरवणे ही चार गावे मोडत असून, मुख्यत्वे विहीर, पंपिंग आणि पाणी लिफ्ट साठवण व वितरण हे समाविष्ट आहे. त्यासाठी ९७ लाख २८ हजार मंजूर आहेत. साळविंडा या योजनेत तीनही वाड्यांना गुरुत्ववाहिनीने पाणीपुरवठा, बंधारा, कलेक्टींग चेंबर, साठवण टाकी हे समाविष्ट असून, ९७ लाख ६४ हजार मंजूर आहेत. तोराडी योजनेमध्ये विहीर, पंप साठवण टाकी या गोष्टी समाविष्ट असून, २३ लाख १८ हजार मंजूर आहेत.

### चार गावांसाठी २ कोटी ३९ लाखांचा निधी

चंदनवाडी (२१ लाख), मांदाटणे (९७.२८ लाख), साळविंडा (९७.६४ लाख), तोराडी (२३.१८ लाख) असे २ कोटी ३९ लाख १ हजाराची मंजुरी व कार्यादेश प्राप्त केले आसल्याचे ग्रा.पा. पुरवठा विभागाचे प्र. उपअभियंता युवराज गांगुर्डे यांनी सांगितले.

### प्रशासकीय मान्यताप्राप्त योजना

१) सोनधर २) कुडगाव.
अंदाजपत्रक सादर झालेल्या योजना
१) खारगाव (बु), २) ठाकरोली, ३) भेकऱ्याचा कोंड, ४) चिचोडा.

### तालुक्यातील १३ गावांतील योजनांचे सर्वेक्षण पूर्ण

२०२४ पर्यंत नळजोडण्यांचे हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची सर्व यंत्रणांनी युद्धपातळीवर अंमलबजावणी काम सुरु आहे. तालुक्यातील १३ गावांतील योजनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत उद्दिष्ट मोठे असले तरी काम पूर्ण करायचे आहे, असे निर्देश पालकमंत्री अदिती तटकरे, खा. सुनील तटकरे, आणि जि.प. सीईओ डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

# एसटी संपामुळे कर्जत एसटी आगाराचे अडीच कोटींचे नुकसान

| नेरळ | वार्ताहर |

कर्जत आगारातून प्रवाशांच्या सेवेत जिल्हाभर गाड्या सोडल्या जातात. परंतु, कामगारांच्या आंदोलनामुळ आगाराचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. दोन महिने आगारातून जेमतेम दहा कर्मचारी काम करीत असून, त्यांच्याकडून वाहने प्रवाशांच्या सेवेत आहेत. मात्र, तरीदेखील तब्बल अडीच कोटींचे नुकसान सहन करावे लागले आहे.



कर्जत एसटी आगारातून कर्जत येथून तसेच नेरळ आणि खालापूर तालुक्यातील खोपोली या स्थानकातून एसटी गाड्या सोडण्यात येतात. परंतु, कामबंद आंदोलनामुळे मागील सव्वा महिना कर्जत आगारातून एकही गाडी बाहेर पडली नव्हती. त्यामुळे दररोज ४२ एसटी गाड्या ज्या २६० फेऱ्या प्रवाशांच्या सेवेत मारत होत्या, त्यांची वाहतूक पूर्णपणे थांबली होती. त्या २६० फेऱ्यांमधून कर्जत आगाराला साधारण साडेतीन ते चार लाखांचा महसूल गोळा होत असतो. मात्र, ८ डिसेंबरपासून १५ जानेवारीपर्यंतचा महसूल गाड्या बंद असल्याने बुडाला होता. तर, या कालावधीत कामगार संघटना यांच्या आवाहनानंतर कर्जत आगारातील तब्बल १९७ कामगारांनी कामबंद आंदोलनात सहभाग नोंदविला होता.

राज्य सरकारमध्ये एसटीचे विलीनीकरण व्हावे यासाठी कर्जत मध्ये कामबंद आंदोलन मध्ये सहभागी झालेल्या ५० कर्मचाऱ्यांना आतापर्यंत बडतर्फीची कारवाईला सामोरे जावे लागले आहे. तर आतापर्यंत केवळ ११ ते १४ कामगारांनी पुन्हा कामावर हजार होऊन सेवा देण्याचा निर्णय घेतल्याने कर्जत आगारातून आता पनवेलसाठी गाडी सोडली जात आहे. त्यामुळे कर्जत आगारातून नवी मुंबई, दादर तसेच अलिबाग, पाली, मुरबाड तसेच कराड आणि धुळे आणि तालुक्यातील २६० फेऱ्यांचे गणित कोलमडून पडले आहे. त्या गणितामुळे कर्जत आगाराचे करोडोंचे नुकसान झाले आहे.

आठ डिसेंबरपासून कर्जत एसटी आगारातून ९० टक्के वाहतूक बंद असल्याने दररोजचे आर्थिक उत्पन्न लक्षात घेता किमान अडीच कोटींचे आर्थिक नुकसानीला कर्जत आगाराला सामोरे जावे लागत आहे. सध्या पनवेलशिवाय अन्य कोणत्याही मार्गा एसटी चालविली जात नाही आणि त्यामुळे कर्जत आगाराला सध्या काही हजारांच्या व्यवसायावर समाधान मानावे लागत आहे.

# प्लॅस्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर मुख्याधिकाऱ्यांची दंडात्मक कारवाई

| कर्जत | वार्ताहर |

प्लॅस्टिक पिशव्यांवर शासनाने बंदी घातली आहे, तरी अजून काही व्यापारी, नागरिक राजरोसपणे प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करीत आहेत. प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी दंडात्मक कारवाई केली आहे.

कर्जत शहरात प्लॅस्टिक बंदी काटेकोरपणे पाळली जात असून, त्याची अंमलबजावणी करीत असताना नियम मोडणारे यांच्याविरुद्ध कडक कारवाई केली जात आहे. दि.११ फेब्रुवारी रोजी शुक्रवारचा बाजार भरला होता. मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सर्व कर्मचारी वर्गाला बरोबर घेऊन सायंकाळी मुख्य बाजारपेठेत पाहणी केली. जे व्यापारी अजून ग्राहकांना प्लॅस्टिक पिशवी देतात, अशा तीन व्यापाऱ्यांवर प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे दंडात्मक कारवाई केली. मुख्याधिकारी डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शखाली अरविंद नातू, जितेंद्र गोसावी, मनीष गायकवाड, लक्ष्मण माने, सुदाम म्हसे, सुनील लाड आदी कर्मचारी सहभागी होते.



■ कर्जत बाजारपेठेत पाहणी करताना मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील.
(छायाचित्र : संजय गायकवाड)

> पथक फिरते राहणार आहे, जे कोणी प्लॅस्टिक पिशवीचा वापर करतील, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.
> – डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी

## म ह त्वा चे

### सव्वा बारा लाखांच्या औषधांची चोरी

| पनवेल | वार्ताहर |

आर्थिक फायद्यासाठी १२ लाख २४ हजारांच्या औषधांची चोरी केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश कुमार चौधरी यांचे वैद्यकीय औषधे विकण्यासाठी कुबेर फर्मान सर्जिकल नावाने सेक्टर २१, कामोठे येथे गाळे आहेत. त्यासाठी त्यांनी पाच मुले कामावर ठेवलेली आहेत. ते त्यांच्या गावी राजस्थान येथे गेले असताना नथुराम सोनाराम चौधरी हा ग्राहकांच्या मागणीप्रमाणे औषधे पोहोच करून त्यांच्याकडून धनादेशाद्वारे रोखीने पैसे घेऊन बँकेत जमा करत होता. सुरेश कुमार यांचा अपघात झाल्याने ते बरेच दिवस दुकानांमध्ये गेले नव्हते. त्यांनी दुकानातील जमा असलेला माल व बँक अकाऊंटमध्ये जमा असलेली रक्कम व येणारी उधारी या सर्वांचा ताळमेळ लावण्याचा प्रयत्न केला असता १२ लाख २४ हजार २५१ रुपये रकमेची तफावत आढळून आले. त्यामध्ये सहा लाख ६३ हजार रुपये रकमेची औषधे चोरीस गेल्याचे आणि पाच लाख ६० हजार रुपये रकमेची औषधे नोकर नथुराम चौधरी याने चोरून २८ ग्राहकांना १० ते १५ टक्के सवलतीने माल विक्री केली. याप्रकरणी नथुराम सोनाराम चौधरी राहणार (जालोर राजस्थान) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# क्षुल्लक कारणावरुन मारहाण

| पनवेल | वार्ताहर |

चहाचे पैसे मागितले म्हणून नोकराला हाताबुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ करून दुकानातील सामानाची तोडफोड केल्याचा प्रकार कामोठे येथे घडला आहे. आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन वरंडे यांचा चहा विक्रीचा व्यवसाय सेक्टर १७, कामोठे येथे आहे. यावेळी दोन इसम मोटारसायकलवरून चहा घेण्यासाठी दुकानात आले. त्यापैकी सिद्धूने चहाची मागणी केली. त्याला चहा देऊन त्याच्याकडे पैशाची मागणी केली असता त्याने चहाचे कसले पैसे असे बोलून शिवीगाळ करून काऊंटरवर ठेवलेले दोन चहाचे थर्मास जमिनीवर फेकले व दुकानांमध्ये प्रवेश करून सचिन यांना आणि त्यांचा नोकर याला हाताबुक्क्यांनी मारहाण केली व तुझ्या दुकान बंद करतो असे बोलून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच दुकानातील इतर सामान अस्ताव्यस्त फेकून तोडफोड केली व नुकसान केले. त्यानंतर ते दोघेही इसम पळून गेले.

याबाबत दोन्ही आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा अधिक तपास कामोठे पोलीस करीत आहेत.




■ शनिवार-रविवारच्या सलग सुट्टीमुळे पर्यटक रायगडात मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. शनिवारी दुपारी अलिबाग-गोंधळपाडा रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्याने वाहनांच्या लांबच लांब लागल्याचे चित्र दिसत होते.

# विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल

| पनवेल | वार्ताहर |

पनवेल तालुक्यातील गावात महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ वर्षीय पीडित महिला पनवेल तालुक्यातील गावात राहते. आरोपीने पीडित महिला आंघोळ करत असताना त्यांच्याकडे पाहून अश्लील शब्द बोलला आणि जातीवाचक शिवीगाळ केली. याबाबत पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पनवेल पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- वधु २५ वर्ष, ५-३ एफ. वाय.बी.ए. तीन बहिणी, त्वरित लग्न ७०३८४३८५०३
- अलिबागमध्ये कॉफी शॉपमध्ये कामासाठी मुलगा पहिजे- संपर्क- ८६९८५०३८८८
- वरसोली बिच रोड येथे 1BHK फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. नंबर- ८८०५५४०४६४
- अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर- ८००७४५२१४६
- अलिबाग एस.टी. स्टॅण्डजवळ दुकान गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क -९७६४५४८६७९

**जाहिरातीसाठी संपर्क**
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# स्व. पा.रा. सानप शेतकऱ्यांचे झुंजार नेते

| गोवे-कोलाड | वार्ताहर |

४० वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळत नसे, त्या काळात आमदार पा.रा. सानप यांनी सहकार क्षेत्राची निर्मिती केली व शेतीचे मालक कुळ झाले पाहिजे यासाठी त्यांनी सर्वांना एकत्रित करून मोठा लढा व संघर्ष केला. पा.रा. सानप हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे झुंझार नेते होते. त्यांचे हे ऋण फेडण्यासाठी त्यांचे कार्य अविरतपणे पुढे नेण्यासाठी तरुणांनी तंटे मिटविण्यात वेळ घालविण्यापेक्षा समाज संघटित करा, त्यांचा आदर्श निर्माण केला पाहिजे. समाजाच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावे, असे मत कै. पा.रा. सानप यांच्या स्मृतीदिनी कोलाड ग्रुप कुणबी समाजाच्या सभेत कुणबी समाज नेते शंकरराव म्हसकर यांनी व्यक्त केले.



## शंकरराव म्हसकर यांचे प्रतिपादन

कुणबी समाजनेते तथा माजी आमदार स्व. पा.रा. सानप यांचा २७ वा पुण्यस्मरण सोहळा कुणबी समजोन्नती संघ मुबंई व रायगड जिल्हा समन्वय समिती ग्रामीण शाखा रोहा ग्रुप कोलाडच्या वतीने कोलाड येथील मंगल कार्यलयात आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खांब विभागीय नेते रामचंद्र चितळकर, नारायणराव धनवी, मारुती खांडेकर, ॲड. सुनील सानप, राजेश सानप, वीणा चितळकर, विजय सानप, दिवान सानप, प्रमुख मान्यवर व कुणबी समाज बांधव उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, सलग तीन वेळा दादासाहेब विधिमंडळात जनमतांवर निवडून गेले. त्यांनी विधिमंडळात ग्रामीण जनतेची व शेतकऱ्यांची उपजीविका म्हणून शेती, त्यामुळे त्यांना हमी भाव मिळाला पाहिजे, तसेच बेदखल कुळांचा प्रश्न यासाठी आवाज उठवत त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

# उरण येथे जाहीर निषेध

| उरण | वार्ताहर |

अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. प्रवीण आष्टीकर पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांच्या अंगावर व चेहऱ्यावर शाई फेकली. या घटनेच्या निषेधार्थ उरण येथील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून लेखणी बंद आंदोलन केले. यावेळी मुख्याधिकारी संतोष माळी यांच्यासह कर्मचारी, अधिकारी यांनी जाहीर निषेध केला.

# पनवेलकरांनी वाहिली स्व. लतादीदींना संगीतमय श्रद्धांजली

➤ जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा पुढाकार ➤ ‘तुम मुझे यू भुला ना पाओगे’ सांगीतिक कार्यक्रम

| साहिल रेळेकर |
| पनवेल |

जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने भारतरत्न स्व. लता मंगेशकर यांना संगीतमय श्रद्धांजली वाहण्यात आली. शुक्रवारी (दि.११ फेब्रुवारी) संध्याकाळी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात संगीतप्रेमींसाठी ‘तुम मुझे यू भुला ना पाओगे’ या सांगीतिक कार्यक्रमाचे विनामूल्य आयोजन करण्यात आले होते.

लता मंगेशकर यांनी आपल्या कारकीर्दीत गायलेल्या निवडक गाण्यांचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. ज्येष्ठ संगीत संयोजक अजय मदन, गायिका संगीता मेळेकर, मिथिला माळी, प्राजक्ता सातर्डेकर, निवेदक आर.जे. गौरव यांच्यासह संपूर्ण वाद्यवृंदाने सादर केलेल्या लतादीदींच्या गीतांनी पनवेलकरांचे मन लतादीदींच्या आठवणीत न्हाऊन निघाले. याप्रसंगी लतादीदींच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून उपस्थितांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उरणचे माजी आ. मनोहर भोईर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उद्योजक दिलीप पाटील, साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रवींद्र पाटील, सुदाम पाटील, रामदास शेवाळे, राजेंद्र पाटील, डॉ. मंगेश डाकी, डॉ. प्रकाश पाटील, साहित्यिक ए.के. शेख, सतीश पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व पनवेलकर संगीतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> लतादीदींनी गायलेल्या गाण्यांच्या सादरीकरणातून त्यांना सांगीतिक आदरांजली वाहण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल व उरण तालुक्यातील नागरिकांना दीदींच्या गाण्यांचे प्रेम देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.
> – प्रीतम म्हात्रे, विरोधी पक्षनेते

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण






परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# मुरूड-मिठागर अंतर्गत रस्त्याची दुरवस्था

## अनेक वर्षांपासून ग्रामस्थ नवीन रस्त्यापासून वंचित





**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील सावली ग्रामपंचायत हद्दीतील मिठागर येथील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, या रस्त्यावरुन पादचारी व वाहन चालवणे धोक्याचे बनले आहे. तरीदेखील संबंधित विभाग या रस्त्याच्या संदर्भात गांभीर्याने घेताना दिसत नसल्यामुळे हा रस्ता अनेक वर्षांपासून बनविण्यात आलेला नाही.

मुरूड-मिठागर अंतर्गत रस्ता १९९२ साली नवीन रस्ता बनविण्यात आला होता. तेव्हापासून आजतागायत रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खडी उघडी पडली असून, या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरुन वाहन चालविणे जिकिरीचे होत आहे. मोठी वाहने या रस्त्यावरून चालूच शकत नाही. दुचाकी वाहनांचे अनेक छोटे-मोठे अपघात या रस्त्यावर झाले. रस्त्याची माती, खडी यावरून दुचाकी वाहने सरकतात. त्यात अनेकांना इजा झाली आहे. मोठ मोठे खड्डे, टपऱ्या यामुळे वाहनचालक त्रासले आहेत. पायी प्रवास करताना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. व्यावसायिक, दुकानदार, विद्यार्थी, प्रवासी या रस्त्याचा वापर करतात. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अनेक प्रवासी ग्रामस्थ, प्रवासी, वाहनचालक रस्ता दुरुस्तीची मागणी करीत आहेत.



## गडरक्षकांच्या सतर्कतेमुळे सरसगडावरील वणवा विझवण्यात यश

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील बल्लाळेश्वराच्या साक्षीला उभा असलेल्या सरसगड किल्ल्याला गुरुवारी वणवा लागला. वणवा लागल्याचे कळताच पालीतील तरुण तसेच वनखात्यातील वनरक्षकांनी किल्ल्याकडे धाव घेतली. सरसगड किल्ल्यावर असणारी नैसर्गिक वनसंपदा वणव्यात जळून जाऊ नये म्हणून या तरुणाने उन्हातान्हाची, आगीची पर्वा न करता वणवा विझवण्याचा प्रयत्न केला. हा वणवा विझविण्यासाठी गडसंवर्धक मिलिंद गोले, दत्तात्रय राऊत, गुरुनाथ शेरमकर तसेच वनखात्यातील नितीन कराडे आदी वनरक्षकांनी जीवाची बाजी लावून सरसगडावरील वनसंपदेचे रक्षण केले. या सर्वांचे तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी कौतुक केले.

## महत्त्वाचे

### मनोज देवकर बेपत्ता

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**



मनोज जयेंद्र देवकर (४५) रा. बागमांडला दांडा, ता. श्रीवर्धन, जि. रायगड हे गृहस्थ दि. २६ जानेवारी रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या दरम्यान आपल्या राहत्या घरातून बेपत्ता झाले आहेत. मनोज देवकर यांची उंची अंदाजे चार फूट पाच इंच असून, बांधा सडपातळ, रंग सावळा, डोळे काळे, केस काळे असून, घरातून बाहेर पडते वेळी अंगावर आकाशी रंगाची टी शर्ट व चॉकलेटी रंगाची फूल पॅन्ट घातली आहे. सदरची व्यक्ती आढळल्यास श्रीवर्धन पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पत्रकार सचिन देसाई यांना पितृशोक

**। माणगाव । वार्ताहर ।**



माणगाव तालुका पत्रकार संघाचे सचिव सचिन देसाई यांचे पिताश्री शरद देवचंद देसाई यांचे शनिवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या दरम्यान राहत्या घरी माणगाव येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक लहान भाऊ, दोन मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने देसाई कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.

### लक्ष्मीबाई घाडगे यांचे निधन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**



व्हिक्टोरिया क्रॉस मरणोत्तर पदक वीर यशवंतराव घाडगे यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यशवंतराव घाडगे यांचे वयाच्या शंभराव्या वर्षी ११ फेबुवारी रोजी सकाळी ८.१५ वाजण्याच्या सुमारास पाटणूस येथे वृद्धापकाळाने त्यांच्या राहते घरी निधन झाले. त्यांच्यावर पाटणूस येथील स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आली. त्यांच्या पश्चात नातेवाईक व त्यांचे भाचे आहेत. दि. १३ फेब्रुवारीला त्यांचे सावडणे, २० फेब्रुवारी रोजी दशपिंडी विधी व २३ फेब्रुवारीला उत्तरकार्य त्यांच्या राहत्या घरी पाटणूस येथे होणार असल्याचे सांगण्यात आले.

## पालकमंत्र्यांप्रती जनतेच्या आदराच्या भावना

### पोलादपूर तालुका महिला व पोलादपूर अध्यक्षांचे मनोगत

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

गेल्या वर्षभरामध्ये महाड आणि पोलादपूर तालुक्यातील आपत्ती काळामध्ये पालकमंत्री अदिती तटकरे यांनी केलेल्या मदतकार्यामुळे दोन्ही तालुक्यांतील जनतेच्या भावना आदरभाव व्यक्त करणाऱ्या असल्याचे मनोगत पोलादपूर तालुका महिला अध्यक्षा प्रतिभा पवार आणि पोलादपूर शहर अध्यक्ष अजित खेडेकर यांनी व्यक्त केले.

कोरोना काळात गोरगरिबांना धान्य व अन्य मदतीचे किट्स वाटप करताना रायगडच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाट, पोलादपूर शहर, तालुक्यातील केवनाळे, साखर-सुतारवाडी, दाभिळ, कुडपण तसेच दरडग्रस्त क्षेत्रामध्ये सरकारी यंत्रणेद्वारे विविध आपत्ती निवारणाची कामे करून तालुक्यातील ग्रामीण जनतेला सर्वतोपरी अन्न, वस्त्र तसेच तातडीच्या मदतीचे वाटप घडविले.



रायगड जिल्ह्यातील पर्यटन विकासाचे क्षेत्र मोठे असताना पालकमंत्री अदिती तटकरे यांनी पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे, साखर येथील नरवीर सूर्याजी मालुसरे तसेच घागरकोंडच्या झुलता पुलासाठी १० कोटींचा निधी मंजूर केला असून, कुडपणसारख्या दुर्गम क्षेत्रामध्ये पाहणी करून मोठ्या प्रकारचे पर्यटनविषयक प्रकल्प आणण्याची मानसिकता व्यक्त करण्याच्या त्यांच्या भूमिकेचे पोलादपूर तालुक्याने स्वागत केले आहे, असे यावेळी अजित खेडेकर यांनी सांगितले.

## स्मशानभूमी गावाच्या मध्यवर्ती भागात हवी

### सन्मित्र ग्रुपची मागणी

**। माथेरान । वार्ताहर ।**



माथेरान हे १८५० मध्ये उदयास आले तेव्हापासून ते आजमितीपर्यंत येथील हिंदू स्मशानभूमी ही गावापासून जवळपास चार किलोमीटर अंतरावर असल्याने मयत नेण्यासाठी त्याचप्रमाणे वृद्ध मंडळींना तिथपर्यंत पायी चालत जाण्यासाठी खूपच त्रासदायक ठरत असते. त्यामुळे ही स्मशानभूमी गावाच्या मध्यवर्ती भागात हवी, अशा मागणीचे निवेदन सन्मित्र ग्रुपने संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे. परंतु, अद्याप कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही.

सध्याच्या अस्तित्वात असलेल्या हिंदू स्मशानभूमीत काही वर्षांपूर्वी डिझेलवर चालणाऱ्या शवदाहिनीची सोय उपलब्ध करण्यात आली होती; परंतु ही मशीनरीसुध्दा डबघाईला आलेली असल्याने खर्च करण्यात आलेले लाखो रुपये गंगाजळीत गेल्यासारखे आहेत. स्मशानभूमी ही खूपच दूरवर असल्यामुळे इच्छा असूनदेखील अनेकांना जाता येत नाही. सन्मित्र ग्रुपच्या सदस्यांनी याकामी पुढाकार घेतला असून, त्याबाबतचे निवेदन प्रशासक मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांना सादर केले आहे. यावेळी सन्मित्र ग्रुपचे चंद्रकांत सुतार, स्वप्नील गोसावी, सुरेश शिंदे, विजय मोरे, महेश जाबरे, सुमित परीठ, योगेश देशमुख, केतन रामाने, विजेंद्र देशमुख, ललित पांगसे, राजू जाबरे, महेंद्र जाबरे, अमर शिंदे, राजेंद्र देशमुख, प्रमोद पाटील, आदेश घाग, योगेश दळवी, तुषार जाबरे आदी उपस्थित होते.

## सुरेखा खाते यांचे निधन

**। म्हसळा । वार्ताहर ।**



म्हसळा तालुक्यातील नेवरूळ ग्रामपंचायतीच्या सदस्या सुरेखा नामदेव काते यांचे दि. ८ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे उपचार घेत असताना निधन झाले. निधनसमयी त्या ६५ वर्षांच्या होत्या. गावातील सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असायचा. अडीअडचणी सोडविण्यासाठी त्यांचा नेहमीच मदतीचा हात असायचा. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सून, नातवंडे व आप्तेष्ट असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी ग्रामस्थ, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या निधनाने परिसरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## आज गोंदवलेकर महाराजांचा नामस्मरण सोहळा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याजवळील हेदवली (ता. रोहा) येथे श्री गोंदवलेकर महाराज नामस्मरण सोहळ्याचे आयोजन रविवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे हे १९ वे वर्ष असून, यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात रविवारी सकाळी ६.३० वाजता काकड आरतीने होणार आहे. त्यानंतर दिवसभराच्या कार्यक्रमांत पंचपदी भजन, सामुदायिक नामजप, सामुदायिक भजन होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ४ वाजता नारायण महाराज लाड (हेदवली) यांचे प्रवचन तर ६.३० वाजता ऐनघर पंचक्रोशी व हरी ओम मित्र मंडळ हेदवली यांचा हरिपाठ होणार आहे. त्यानंतर अन्नप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ९.३० वाजता मारुती महाराज कोल्हटकर (तळवली) यांच्या सुश्राव्य किर्तनाने या नामस्मरण सोहळ्याची सांगता होणार आहे.



## डॉ. संदेश गुरव 'उत्कृष्ट प्राचार्य'

**। नागोठणे । वार्ताहर ।**



कोएसोच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांना सन २०२१-२२ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यामार्फत 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाने नोंदवलेला सहभाग व विशेष कार्य यांची दखल घेऊनच हा पुरस्कार देण्यात आला.

डॉ. संदेश गुरव यांना पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांचे कोएसोचे अध्यक्ष संजय पाटील, कार्याध्यक्ष अजित शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, नरेंद्र जैन, अनिल काळे आदींनी अभिनंदन केले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### सावधान नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीने कळविण्यात येते की, श्री. शरद श्रीधर पाटील, रा. परहूरपाडा, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी त्यांचे मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकती आमचे अशिल श्री. प्रणय गोयल, रा. मुंबई यांस कायम मालकी हक्काने विकत देण्याचे ठरवून तसा तोंडी ठराव ता. १७/१२/२०२१ रोजी त्यांचेबरोबर केला आहे व आमचे अशिलांकडून बयाणा रक्कम स्विकारली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| भिसराई | ९२ | ०-३६-५० पो. ख. ०-०६-५० ०-४३-०० ही संपुर्ण मिळकत व | २.८५ |
| भिसराई | ९३/अ/१/१/१ | ०-७७-९३ | ५.२५ |

पैकी श्री. शरद श्रीधर पाटील यांचे मालकीची ० हे. ८.०७ आर एवढी मिळकत.

सदर मिळकतीबाबत मालकी हक्कांची योग्य ती पडताळणी करून त्यानंतर थेट खरेदीखताचे व अन्य संबंधित दस्त नोंदणीकृत करावयाचे व एकाचवेळी मिळकतीची संपुर्ण मोबदला रक्कम देण्याचे ठरले आहे.

तोंडी ठरावानंतर श्री. शरद श्रीधर पाटील यांनी वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देण्यास लेखी संमती दिली आहे. त्याप्रमाणे ता. १८/१२/२०२१ रोजीच्या दैनिक कृषीवलमध्ये मिळकतीचे मालकी हक्कांस व नियोजित खरेदी-विक्री व्यवहारांस हरकत मागविणारी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्या नोटीसीस आजपर्यंत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत उपस्थित केलेली नाही. त्यानंतर ता. १/१/२०२२ रोजी श्री. शरद श्रीधर पाटील यांनी व्यवहार लवकरातलवकर पुर्ण करणेबाबत लेखी विनंती आमचे अशिलांस केल्यावरून आमचे अशिलांनी तातडीने खरेदीखताचा मसुदा तयार करून घेतला व खरेदीखताकरीता आवश्यक ते मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरणेपुर्वी श्री. शरद श्रीधर पाटील यांचेबरोबर संपर्क साधला असता श्री. शरद श्रीधर पाटील यांची बुद्धी फिरली असून ते आता आमचे अशिलांचेबरोबर ठरलेला व्यवहार पुर्ण न करण्याच्या भाषा बोलत आहेत.

उर्वरित मोबदला रक्कम देऊन तोंडी ठरावाप्रमाणे ठरलेल्या मुदतीत आमचे अशिल सदरचा विक्री व्यवहार पुर्ण करण्यास तयार होते व आहेत. तरी सदर मिळकतीसंदर्भात श्री. शरद श्रीधर पाटील यांचेबरोबर वर वर्णन केलेल्या मौजे भिसराई गट नं. ९२ ही संपुर्ण मिळकत व ९३ (पैकी ० हे. ८.०७ आर) या मिळकतींसंदर्भात कुणीही कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी करू नयेत अथवा विक्री व्यवहार करू नये. तसा व्यवहार केल्यास, तो आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही व आमचे अशिल वर नमूद केलेल्या इसमांसह इतर संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : १३/२/२०२२

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे-विहीघर, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे विहिघर, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड**

| जमिन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| श्री. विष्णू गोपाळ पाटील, श्रीमती.अनुबाई लक्ष्मण पाटील श्रीमती.अंबीबाई गोपाळ पाटील उर्फ आनंदी बाळाराम वास्कर कविता नरेश पाटील, कृष्णा बळीराम पाटील, वनिता शंकर भोईर, श्रीमती सुनिता जगदीश पाटील, बारकी वसंत पाटील | १६/२/१ | ०-४५-०० पो.ख. ०-०३-०० एकुण ०-४८-०० | १०.६० |

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न-आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

पनवेल
दि. १२/०२/२०२२

**विरेंद्र त्रिं.कुळकर्णी**
ॲडव्होकेट,पनवेल

पत्रव्यवहाराचा पत्ता:- फ्लॅट नं. १/५०१-५०२, नील पार्क, तालुका पोलिस स्टेशन जवळ, ता.पनवेल,जि.रायगड. ४१० २०६, फोन नं. २७४६०४८३

### एस.एस.निकम इंग्लिश स्कुलमध्ये RTE अंतर्गत इयत्ता पहिली करिता प्रवेश प्रक्रिया सुरू

माणगांव एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेच्या
**एस.एस.निकम इंग्लिश स्कूल, माणगांव, लोणेरे, इंदापूर व तळा**

या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता RTE अंतर्गत २५ टक्के आरक्षण संदर्भात इयत्ता पहिली करिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक १६/०२/२०२२ पासून सुरू होत आहे.

सदरचे प्रवेश हे वंचित घट - (SC,ST,NT, OBS व SBC प्रवर्गाकरिता)तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक-(वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा कमी असणारे) तसेच घटस्फोटित महिला, विधवा महिला यांची बालके, अनाथ बालके व दिव्यांग बालके यांच्यासाठी आरक्षित आहेत.

सदर प्रवेश प्रक्रियेकरिता रहिवासी (निवास) पुरावा, विद्यार्थ्यांच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र (असेल तर), उत्पन्नाचा दाखला, जन्माचा दाखला, घटस्फोटित महिलांकरिता न्यायालयाचा निर्णय, विधवा महिलांकरिता पतीचे मृत्यूच प्रमाणपत्र, अनाथ बालकांकरिता पालनकर्त्यांचे हमीपत्र, विद्यार्थ्यांचे छायाचित्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

सदरची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. पालकांनी स्वतः ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा आहे व त्याकरिता खालील वेबसाईट वर अर्ज व सर्व माहिती उपलब्ध आहे.

वेब साईटः- https://student.maharashtra.gov.in-RTE 25% Portal
Or
https://rte25admission.maharashtra.gov.in/adm_portal/Users/rteindex

तरी पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन एस.एस.निकम इंग्लिश स्कूल, माणगांव, लोणेरे, इंदापूर व तळा तर्फे करण्यांत आले आहे.

**सही/-**
**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**
**एस.एस.निकम इंग्लिश स्कूल**
**माणगांव, लोणेरे, इंदापूर व तळा**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्यांच्या विद्यमान मालक १)रीना प्रमोद चिंबुलकर, २)प्राचीन प्रमोद चिंबुलकर, ३)प्रियांका प्रमोद चिंबुलकर यांच्याकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजाराहित असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. | क्षेत्र(हे.आर.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे ता.अलिबाग | १५९ | ०-५१-६० +ख.०-०९-४० एकूण ०-६१-०० | ११.८१ |

वरील मिळकती पैकी ०-३०-५ हे.आर.हि मिळकत १) रीना प्रमोद चिंबुलकर, २)प्राचीन प्रमोद चिंबुलकर, ३)प्रियांका प्रमोद चिंबुलकर यांच्या मालकीची आहे. व सदरची मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्यूपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्यानेही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :१२/०२/२०२२

सही/-
**ॲड. सुजित पां.पाटील**
ऑफिस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ केळकर नाका,अलिबाग
मो.नं. ९८८१४४५३५२.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-इंद्रपे, ता.अलिबाग येथील गट क्रमांक व उपविभाग ८ क्षेत्र ०-१९.३० हे.आर+ पो.ख.०-०२.७० हे.आर, एकूण क्षेत्र ०-२२.०० हे.आर.आकार ४.०२ पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०७.३० हे.आर.+ पो.ख.०-०२.७० हे.आर., एकूण क्षेत्र ०-१०.०० हे.आर.आकार २.०८ पैसे ही मिळकत १) श्री.अनिल सुरेश खेडकर, २)सौ.मिना अनिल खेडेकर यांच्या मालकी व ताबे कब्जाची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरून तसे दिसते. सदरहू मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायम फरोक्त घेण्याची ठरविलेली आहे. तरी सदरहू मिळकतींत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, साठेकरार, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र वगैरे प्रकारचा हक्क, वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हकरत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून फरोक्तखत रजिस्ट्रर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग,
दिनांक १२-०२-२०२२

सही/-
**ॲड.विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १)हसू रावजी हजारे आणि २)शंकर खंडू शिंगे यांनी खालील वर्णनांची बिनशेती मिळकती त्यांचे मालक श्री.सौरभ अग्रवाल यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-कोल्हारे, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं /प्लॉट नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| | | चौरस मीटर | रू-पै |
| ७८ | १५ | ३५५ | ३५.५० |
| ७८ | १६ | २९४ | २९.४० |
| ७८ | १७ | २८६ | २८.६० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड.प्रवीण शांताराम खडे**
पत्ता-२, 'लक्ष्मी सदन', जुने एम.टी.स्टॅण्ड
मु.पो.नेरळ, ता.कर्जत जि.रायगड


तुफानातील दिवे
दीपक शेडगे
९९६९४०८८३५

# गरीब विद्यार्थांसाठी विद्यादानाचा यज्ञ



काही व्यक्ती अशा असतात की आयुष्याच्या अंतापर्यंत त्या आपण निवडलेल्या कार्यक्षेत्रात काम करीतच राहतात. दहा ते सहा ही चाकोरीबध्द कार्यपध्दती झुगारुन देत दिवसाच्या चोवीस तासापैकी अठरा-अठरा तास कार्यमग्न राहतात. त्या व्यक्ती नोकरीत असतानाही त्यांची तास न मोजता काम करण्याची सवय असते तशीच रिटायरमेंट म्हणजेच सेवानिवृत्ती ही संकल्पना देखील त्यांनी झुगारून दिलेली असते. कार्यक्षेत्र मग ते कोणतेही असो तीच त्यांची कर्मभूमी असते. सामाजिक, राजकीय, शिक्षण, सामाजिक सेवा, पत्रकारिता, कला किंवा क्रीडा क्षेत्र यापैकी कोणतेही क्षेत्र असले तरी त्या कार्यक्षेत्रात अविरत परिश्रम करण्याची त्यांची प्रवृत्ती त्यांना आयुष्याच्या शेवटापर्यंत स्वस्थ बसू देत नाही. कारण त्यांनी निवडलेले कार्यक्षेत्र हे त्यांच्या आवडीचे असते आणि ज्या समाजत आपण जन्म घेतला आहे त्या समाजासाठी तळमळीने व निस्वार्थीपणे काम करण्याची त्यांची मनापासूनची इच्छा असते. त्यात काहीतरी भव्य-दिव्य करुन दाखविण्याची त्यांची मनोकामना असते. आयुष्याच्या उत्तरार्धापर्यंत शिक्षण क्षेत्रात अविरत कार्यमग्न राहणार जे. के. जाधव
नावाचं व्यक्तिमत्व हे अशा दुर्मिळ व्यक्तीमत्वापैकी एक व्यक्तिमत्व.

**उज्वल शैक्षणिक कारर्किद**

जगन्नाथ खंडेराव जाधव हे त्यांचं नाव. परंतू जे.के. जाधव या नावानेच ते सर्वत्र ओळखले जातात. ५ जूलै १९४९ रोजी औरंगाबाद येथे त्यांचा जन्म झाला. त्यांची शैक्षणिक कारर्किद उल्लेखनीय ठरली. डिस्टिक्शन सहित त्यांनी बी.ई. (इलेक्ट्रीकल) ही पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी पी.जी.डी.बी.एम. ही पदवी डिस्टिक्शन सहीत मिळविली. तसेच त्यांनी मुंबई विद्यापीठातून एम.एस.एस. (एम.बी.ए.) ही पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली.

**यशस्वी व्यावसायिक कारकिर्द**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागात वर्ग-१ अधिकारी म्हणून वेगवेगळ्या पदावर २८ वर्षे काम केले. सामाजिक आणि शैक्षणिक कार्य स्वतंत्रपणे करता यावं याकरिता त्यांनी शेवटी 'अतिरिक्त उद्योग संचालक या पदावरुन २००४ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतली.

**शैक्षणिक व सामाजिक कार्य**

सन १९८४ मध्ये जे.के. जाधव यांनी भारतीय ग्रामीण पुर्नरचना संस्थेची औरंगाबाद येथे स्थापना केली. औरंगाबाद मधील ग्रामीण विभागातील गरीब मुलांसाठी शिक्षण देण्याची प्रेरणा मनात घेऊन त्यांनी ही संस्था स्थापन केली. समाजातील तळागाळातील गरीब विद्यार्थांसाठी अतिशय कमी फी घेऊन शिक्षण देण्याचे पवित्र काम सुरु केले. ज्या मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे कमीत कमी फी भरणे देखील शक्य नव्हते त्यांची फी त्यांनी स्वत: भरली. मुंबई मधील वडाळा पूर्व येथील गरीब वस्तीत राहणाऱ्या मुलांसाठी भारतीय ग्रामीण पुर्नरचना संस्थेची शैक्षणिक शाखा सुरु केली. या संस्थेला आज जे. के. नॉलेज सेंटर म्हणून ओळखले जाते. येथे सुमारे २५ विद्यालये असून अभियांत्रिकी व्यवस्थापन, बी.एड. बी.ए. बी.कॉम. बी.एस.सी. इत्यादी अभ्यासामाची सुमारे २० महाविद्यालये सुरु आहेत. जे.के. ॲकॅडमी आर्ट ऑफ डिझाईन, मुंबई अशा नावाने मुंबईतील गरीब विद्यार्थांना कलाविषयक शिक्षण कमी फी मध्ये देण्याच्या उद्देशाने त्यांनी ही संस्था सुरु केली. मुंबईतील सुप्रसिध्द रहेजा कॉलेज ऑफ आर्ट ही संस्था बंद पडण्याची वेळ आली. तेव्हा तिथे कलाविषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांचं पुढे काय होईल या चिंतेने त्यांनी ही संस्था सुरु करण्याचा निर्णय घेतला. आणि रहेजा स्कूल ऑफ आर्ट मधील कला विषयक शिक्षण देणाऱ्या सर्व प्राध्यापक वर्गाला व कला विषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांना जे.के. ॲकॅडमी ऑफ आर्ट अँड डिझाईन, मुंबई या संस्थेत सामावून घेतले. मुंबई इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च मुंबई कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स या नावाने कॉलेज सुरु केली. मुंबईत दिवसा नोकरी करणाऱ्या व मनात शिक्षणाची आवड असून देखील शिक्षण न घेऊ शकणाऱ्या तळागाळातील गरीब मुलांसाठी नाईट कॉलेज सुरु केलं. मराठी आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी बी.एड. कॉलेज सुरु केली. मुंबई सारख्या श्रीमंत शहरात पैसे मिळविण्याच्या हेतूने शैक्षणिक संस्था सुरु करणाऱ्या शिक्षण सम्राटांकडे पाहिल्यानंतर समाजातील तळागाळातील गरीब विद्यार्थांसाठी शिक्षण दानाचे पवित्र कार्य करणारे जे. के. जाधव यांचं शैक्षणिक क्षेत्रातील हे उल्लेखनीय काम नक्कीच समाजाने दखल घ्यावी असं आहे. तुफानातील हा दिवा वयाच्या ७१ व्या वर्षी देखील आजच्या तरुण पीढीला प्रेरणा देईल अशा पध्दतीने आजही अविश्रांत काम करीत आहे.

**शैक्षणिक व सामाजिक कार्य**

जे.के.जाधव यांनी मुंबईतील गरीब विद्यार्थांसाठी शिक्षणदानाचं पवित्र कार्य कसं केलं आहे तसंच औरंगाबाद मधील ग्रामीण व गरजू विद्यार्थांसाठी देखील शिक्षणदानाचं पवित्र काम केलेलं आहे.

जे.के. जाधव यांनी भारतीय ग्रामीण पुर्नरचना संस्था, औरंगाबाद या संस्थेची स्थापना १९८४ मध्ये केली. या संस्थेतर्फे औरंगाबाद जिल्ह्यात सुमारे २५ विद्यालये आणि अभियांत्रिकी व्यवस्थापन, बी.एड., बी.ए. बी.कॉम. बी.एस्सी इ. अभ्यासामाची सुमारे २० महाविद्यालये सुरु आहेत. तसेच जाधव यांनी लोकविकास बँक, पतसंस्था, औद्योगिक वसाहत, लोकवाचनालय, जिनिंग प्रेसिंग फॅसिंग फॅक्टरी इ. अनेक समाजोपयोगी उपाम औरंगाबाद जिल्ह्यात सुरु केले आहेत.



राजर्षि शाहू इन्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, औरंगाबाद (एम.बी.ए., एम.सी.ए.), श्री. साई कॉलेज ऑफ मॅनेजमेंट रिसर्च सेंटर, (एम.बी.ए., आणि एम.सी.ए.), औरंगाबादमधील परदरी येथील श्री साई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पैठण येथील नाथ पॅलिटेक्निक, गंगापूर येथील मातोश्री पार्वतीदेवी जाधव महिला आर्टस्, कॉमर्स, सायन्स येथील महाविद्यालय, वैजापूर येथील अनुमे जीवन विकास महाविद्यालय व जे.के. जाधव कॉलेज ऑर्टस्, कॉमर्स व सायन्स या महत्वाच्या शैक्षणिक संस्था त्यांनी औरंगाबादच्या ग्रामीण विभागात सुरु करुन ग्रामीण विभागात राहणाऱ्या व शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या गरीब विद्यार्थांना शिक्षण देण्यासाठी सुरु केल्या. औरंगाबादमध्ये सहकार चळवळ उभारुन लोकविकास नागरी सहकारी बँक लि. ची स्थापना केली. या बँकेचे अनेक भागधारक असून उद्योग व्यवसाय सुरु करणाऱ्या अनेक गरीब, गरजु व होतकरु उद्योजकांना अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करुन दिले. सहकारामध्ये माणूस एकमेकांना सहकार्य करुन मोठा होतो याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजेच शिरुर येथे त्यांनी सुरु केलेली किसान विकास जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था आणि वैजापूर येथील लोकविकास नागरी सहकारी पतसंस्था. या सहकारी बँक व पतसंस्थेतून कर्ज घेऊन अनेकांनी आपला उद्योग व्यवसाय सुरु केला आणि अनेक ते उद्योजक स्वत:च्या पायावर उभे राहीले. ग्रामिण विभागात सहकारी बँक किंवा सहकारी पतसंस्था स्थापन करणे हे काम सोपे नाही आणि सुरु केलेल्या बँका किंवा पतसंस्था यांच्या विषयी लोकांच्या मनात विश्वासार्हता निर्माण करणे हे त्याहीपेक्षा कठीण काम असते. परंतु जे.के. जाधव यांनी आपल्या कौशल्यपूर्ण प्रशासकीय काम करण्याच्या पध्दतीने या दोन्ही संस्था नावारुपात आणल्या. ते आपल्या पारदर्शक पध्दतीने काम करण्याच्या हातोटीबद्दल प्रसिध्द आहेत. औरंगाबाद मधील ग्रामीण विभागातील समाजमनात सहकार चळवळ रुजविण्यात जाधव यांचा सिंहाचा वाटा आहे. लोकांची कर्जाची गरज भागविण्याचा जसा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला तसाच या दोन्ही संस्थाच्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यातही महत्वाचं काम केलं.

**प्रकाशित साहित्य**

सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा भार खांद्यावर घेऊन जगताना त्यानी आपल्या जवळ असलेल्या अंगभूत लेखकाची जोपासनाही केली. आपल्या व्यावसायिक अनुभवावर आधारित त्यांनी अनेक पुस्तके लिहिली पण त्याच बरोबर ललित लेखन देखील केले. मुखवटे हा त्यांचा ललित लेखाचा संग्रह वाचनिय ठरला आणि लोकप्रियही झाला. खलिल जिब्रानच्या 'गार्डन अँड प्रॉफेट, सॅड अँड फोमठ चा मराठीत भावानुवाद केला. पंडित जवाहरलाल नेहरु : एक द्रष्टा व तत्वचिंतक आणि यशवंतराव चव्हाण : एक महान द्रष्टा ही त्यांची दोन चरित्रात्मक पुस्तके वाचक वर्गात लोकप्रिय ठरली. शेक्सपियच्या नाटकांच्या कथा, गीतांजली, मार्गाधारे वर्तावे, परिसस्पर्श ही त्यांची विविध आणि वैशिष्ठपूर्ण पुस्तके त्यांच्या सहज-सुलभ आणि ओघवत्या भाषा शैलीमुळे गाजली. माझे ग्रामीण पुनर्रचनेचे प्रयत्न आणि संघर्ष हे पुस्तक तर त्यांच्या स्वानुभवावर आधारित असल्यामुळे आज सामाजिक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यासाठी अतिशय उपयुक्त असे आहे. सुशिक्षित बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार योजना, स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य व लघु उद्योगांसाठी सोयी-सवलती ही त्यांची ३ पुस्तके तरुणवर्गासाठी उपयुक्त आहेत.

'युवकांनो स्वावलंबी व्हा, श्रीमंत व्हा या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनायात सुमारे २८ वर्षे वर्ग -१ अधिकारी असल्यामुळे त्यांना असलेला उद्योजक घडविण्याचा व त्यांना मार्गदर्शन करण्याचा दिर्घ अनुभव आहे. तो अनुभव ज्या पुस्तकात परावर्तीत झालेला आहे. उद्योगकांना प्रेरणा देण्यासाठी जगातील सुमारे ५० यशस्वी उद्योजकांची बोध वाक्ये प्रस्तुत पुस्तकात दिली आहे. सामुहिक प्रोत्साहन योजना, क्लस्टर डेव्हलपमेंट योजना, बीज-भांडवल योजना, महाराष्ट्रातचे नवीन औद्योगिक धोरण, प्रकल्प अहवाल तयार करणे इत्यादी विषयी आणि अनेक शासकीय योजनांची माहिती जाधव यांनी प्रस्तुत पुस्तकात आपल्या ओघवत्या शैलीत दिली आहे. नवीन उद्योजकांना आणि सद्या उद्योग क्षेत्रात असलेल्या उद्योजकाला उपयुक्त असे हे पुस्तक आहे.

जे.के.जाधव यांच्यासारखे सामाजिक जाणिवेची जाण असलेले समाजसेवक आज समाजात वावरत असल्याने विविध मुलभूत गरजांपासून वंचित राहिलेल्या घटकांना दिलासा मिळतोय हे नक्की.भविष्यातही त्यांचा हा ज्ञानयज्ञ असाच तेवत रहावा.समाजातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांना या ज्ञानयज्ञातून ज्ञानाचा प्रसाद मिळावा,एवढीच सदिच्छा.

आपल्या सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक संवेदनाशील जाणिवांचा आयुष्याच्या उत्तरार्धातही समाजासाठी उपयोग करणाऱ्या जे.के. जाधव यांना लाख लाख सलाम!

deepakshedge007@gmail.com

# साप्ताहिक राशिभविष्य : दि. १३ ते १९ फेब्रुवारी २०२२

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## विविध क्षेत्रात प्रगतीची संधी

**मेष :** मेषराशीधारकांना आपले ग्रहमान पाहता आपणास राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. आपण सर्वांशी प्रेमाने वागल्यास हीच मंडळी आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतिल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल तरीही जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाकार मंडळीना कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळेल, आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **महिलावर्ग :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले **राहील शुभ दिनांक :** १६,१८ .

## साहसी कृत्ये टाळावीत

**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळावीत नाहीतर संकटात पडू शकता, मुलांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व्यापाराला चालना मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, शेतीत लाभ होईल आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **महिलावर्ग :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक :** १८,१९.

## आर्थिक व्यवहार जपून

**मिथुन :** मिथुनराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. **महिलावर्ग :** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक** : १४,१९.

## नोकरीत चैतन्य

**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहात आपण आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा आपण आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल व घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. उधारी घेऊ नका देऊ नका. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. **महिलावर्ग :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. **शुभ दिनांक :** १५,१७.

## प्रलोभने टाळा

**सिंह :** सिंहराशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्याल. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत व पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे य़ोग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. आपली शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. **महिलावर्ग :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक :** १४,१७..

## उद्योग,व्यवसायात चालना

**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहात सुरवातीला कानावर चांगली बातमी येईल मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. आपण सर्वांशी बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळेल त्यांचा गोरव होण्याची शक्यता राहील. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. थोरामोठ्यांच्या भेटी होण्याची शक्यता राहील. कोणालाही पैसे उधार देऊ नका. जमीन राहू नका. कामावर आपले काम हलके करण्यासाठी योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा व आपली जबाबदारी कमी करा. **महिलावर्ग :** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक : १३,१८.**

## कार्य साध्य होणार

**तूळ :** तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल, आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे पण बडेजाव मात्र टाळा. काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. हितशत्रूंवर नजर ठेवा. अचानक साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या व भावी आयुष्याचा विचार करून वागा. सरकारी नियमांचे पालन करणे हिताचे राहील. सामाजिक कामाला प्राधान्य द्या त्याचे पडसाद आपल्यासाठी फायद्याचे असतील. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. **महिलावर्ग :** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. . **शुभदिनांक :** १५,१८.

## उधार,उसणवारी टाळा

**वृश्चिक :-** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा, किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. काही नवीन प्रस्ताव मिळतील, मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. जागेसंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. **महिलावर्ग :** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **शुभदिनांक :** १३,१९.

## आठवडा उत्तम जाणार

**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. मात्र आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा.अपेक्षित गोस्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील, गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल, मनातिल वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे.**शुभदिनांक :** १४,१६.

## नवीन नोकरी लाभदायक

**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका त्रास होऊ शकतो. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे, कलेत मन रमवाल, योगाचा अवलंब करा, कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल . व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. मन लागले नाही तरी अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे, अशा परिस्थितीत अभ्यासा विषयी आपली दृढ इच्छाशक्तीच मदतरूप ठरेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. **महिलावर्ग :** ह्या महिन्यात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दहा दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक:** १८,१९.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**कुंभ :** कुंभराशीधारकांचे या सप्ताहातील ग्रहमान पाहता बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. घरगूती संबंधात सान्निध्य टिकून राहील. आपण प्रणयी जीवनात अधिक मग्न राहिलात तरी नंतर आपल्या संबंधात वैविध्य राखण्यात व जोडीदारास खुश ठेवण्यात आपणास कष्ट करावे लागतील. अशा परिस्थितीत प्रसंगानुसार भेटवस्तू देऊन आपल्या जोडीदाराशी जवळीक साधू शकाल. धार्मिक कारणांसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. शक्यतो कोणाशीही उधार उसनवारी करणे टाळावे. या दरम्यान काही ना काही कारणांनी अनेकदा प्रवास करावे लागतील. एखाद्या अनोळखी व्यक्तीकडून किंवा स्रोताकडून आर्थिक किंवा अन्य लाभ मिळवू शकाल. मात्र, शेअर्स किंवा तत्सम काम करणाऱ्यानी नंतर खूपच सावध राहावे लागेल, अन्यथा मोठ्या नुकसानास सामोरे जावे लागेल. **महिलांना :** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक-**१५,१७.

## विद्यार्थ्यांसाठी अनुकूल

**मीन :** मीनराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता हे दिवस विद्यार्थ्यांसाठी चांगले असले तरी प्रवेश परीक्षा किंवा नेहमीच्या परीक्षा व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमात थोडी जास्त मेहनत करावी लागेल. नंतर आपणास अभ्यासात खूप मेहनत वाढवावी लागेल. तसेच आरोग्याची खूप काळजी घ्यावी लागेल, अन्यथा आजारपण बळावण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या आपण एखाद्या अशा व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल कि जी आपल्याहून वयाने अधिक मोठी किंवा लहान असेल. विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड विचारपूर्वक करावी लागेल. **महिलांना** :मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा. **शुभ दिनांक**- १४,१८.

चिंतन

प्रसाद केरकर
९८६७७२१११०

**अलिबाग-विरार हा मल्टिमॉडेल कॉरिडॉर उभारणीच्या कामाच्या प्रक्रियेला वेग आला आहे. यामुळे मुंबईच्या पश्चिम उपनगरापासून अलिबाग हाकेच्या अंतरावर येईल. अर्थातच यामुळे रायगड जिल्ह्याच्या व अलिबागच्या विकासाला हातभराच लागणार आहे. त्यामुळे याचे स्वागतच होईल. या प्रकल्पामुळे जे हजारो शेतकरी रस्त्यावर येणार आहेत व त्यासाठी आता आंदोलन उभे राहिले आहे. या रस्त्याला कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही, तर येथील प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन होणे गरजेचे आहे.**

# मुंबई-रायगडला जोडणारा सेतू

मुंबईपासून हाकेच्या अंतरावर रायगड जिल्हा असला आता विरार-अलिबाग कॉरिडॉरमुळे हा जिल्हा आता मुंबई महानगराच्या आणखी जवळ येणार आहे. मुंबईची उपनगरे लोकसंख्यने तुडुंब भरल्यावर त्याही पुढे जाऊन आणखी विस्तार करण्याचे ठरले. त्यातूनच नवी मुंबई हे जुळे शहर वसविले गेले. त्याचबरोबर पनवेलचाही विकास सुरु झाला आणि हे शहर आता मुंबईचे एक उपनगरच बनले. रायगड जिल्हा समुद्रमार्गे, रेल्वे व रस्त्याद्वारे जसा जोडला गेला आहे, तसेच आता नवी मुंबईतील विमानतळामुळे आंतरराष्ट्रीय वाहतुकीलाही जोडला जाणार आहे. त्याचबरोबर शिवडी-न्हावा शेवा हा सागरी उड्डाणपूल मार्गी लागल्यावर हा जिल्हा आणखी एका नवीन मार्गाने मुंबईच्या जवळ जाणार आहे. जेएनपीटीच्या स्थापनेमुळे हा जिल्हा जागतिक जलवाहतुकीच्या केंद्रस्थानी आला. या सर्व प्रकल्पांमुळे रायगड जिल्ह्यात झपाट्याने औद्योगिकीकरण झाले. अलिबाग ते गेटवे ही प्रवासी जलवाहतूक दोन दशकांपूर्वी सुरु झाल्यावर अलिबागचे पर्यटन वाढले. अलिबागला वळसा घालून येण्याएवजी गेटवेवरुन समुद्रमार्गे येणे सोपे झाले. यात वेळ व पैसा वाचू लागला. त्यामुळे हा जिल्हा मुंबईच्या जवळ आणखीनच जोडला गेला. आता अलिबाग-विरार हा मल्टिमॉडेल कॉरिडॉर उभारणीच्या कामाच्या प्रक्रियेला वेग आला आहे. यामुळे मुंबईच्या पश्चिम उपनगरापासून अलिबाग हाकेच्या अंतरावर येईल.

अर्थातच यामुळे रायगड जिल्ह्याच्या व अलिबागच्या विकासाला हातभराच लागणार आहे. त्यामुळे याचे स्वागतच होईल. या प्रकल्पामुळे जे हजारो शेतकरी रस्त्यावर येणार आहेत व त्यासाठी आता आंदोलन उभे राहिले आहे. या रस्त्याला कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही, तर येथील प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन होणे गरजेचे आहे. अगोदर योग्य पुनर्वसन व नंतर प्रकल्प हे धोरण महाविकास आघाडीच्या सरकारने राबविल्यास या प्रकल्पाला कोणाचाही विरोध राहणार नाही. या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला दिला जाणे आवश्यक आहे. नवी मुंबईतील नवीन विमानतळ उभारण्याच्या वेळीदेखील असाच विरोध झाला होता व त्यावेळी शेतकऱ्यांनी आंदोलन करुन आपल्या मागण्या पदरात पाडून घेतल्या होत्या. आतादेखील हीच वेळ आली आहे. त्यादृष्टीने आंदोलनाचे पडसाद घुमू लागले आहेत. सरकारने या शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्यास या प्रकल्पाला विलंब लागणार नाही. या प्रकल्पाची घोषणा करुन आता दहा वर्षांहून जास्त काळ लोटला आहे. त्यावेळी हा प्रकल्प जेमतेम १२ हजार कोटी रुपयांचा होता. आता हा प्रकल्प रखडल्यामुळे खर्च ३९ हजार कोटींवर गेला आहे. जर सरकारने या शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर हा प्रकल्प पुन्हा रखडेल व परिणामी खर्चातील वाढ ही मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच जाईल. मुंबईला व त्याच्या परिसराला अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन मुंबईवरील ताण कमी करणे गरजेचे आहे, हे आता सरकारने ओळखले आहे. यादृष्टीने या १२८ कि.मी. लांबीच्या कॉरिडॉरची निर्मिती करण्याची योजना एमएमआरडीएने २००८ मध्ये आखली. १६ मार्गिकेच्या या प्रकल्पातील एक मार्गिका बससाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. विरार ते अलिबागदरम्यानच्या अनेक छोट्या-मोठ्या गावांना जोडणारा आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधणारा असा हा मार्ग असेल. भिवंडी बायपास, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-दिल्ली महामार्ग या प्रकल्पाने जोडला जाणार आहे. त्याचबरोबर जेएनपीटी, मुंबई पारबंदर प्रकल्पालाही ही महामार्गिका जोडली जाणार आहे. या प्रकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, यावर ४८ भुयारी मार्ग आणि ४१ पूल बांधण्यात येणार आहेत. जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य घेऊन राज्य सरकारच्या मदतीने हा प्रकल्प मार्गी लावण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला. लुईस बर्जर या सल्लागार कंपनीने २०१० मध्ये या प्रकल्पाचा तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता अहवाल सादर केला. त्यानुसार एमएमआरडीएने प्रकल्प राबविण्याची तयारी सुरू केली. मात्र, भूसंपादन आणि या प्रकल्पाला होणारा विरोध पाहता २०१९ पर्यंत एमएमआरडीएला हा प्रकल्प मार्गी लावता आला नाही आणि एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प कागदावरच राहिला. परिणामी, खर्चात भरमसाठ वाढ झाली. भविष्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्नही ऐरणीवर आला. या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसी आणि एमएमआरडीएने प्रकल्प अदलाबदली करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २०२० मध्ये बहुद्देशीय मार्ग एमएसआरडीसीकडे गेला, तर रखडलेला ठाणे ते बोरीवली भूमीगत मार्ग एमएसआरडीसीकडून एमएमआरडीएकडे आला. आता या दोन्ही यंत्रणा आपल्याकडे आलेला प्रकल्प प्रत्यक्ष मार्गी लावण्यासाठी एक-एक पाऊल पुढे टाकत आहेत. त्यादृष्टीने अलिबाग-विरार कॉरिडॉरच्या कामाला गती लाभली आहे. १२८ कि.मी.च्या कॉरिडॉरसाठी एमएसआरडीसीला १३४७ हेक्टर जागा संपादित करावी लागणार आहे. त्यानुसार सध्या ८५ गावांमध्ये भूमापन सुरू असून, १० गावांतील भूमापन अंतिम टप्प्यात आहे. ही प्रक्रिया सुरू असली तरी अनेक गावांमध्ये जमीन मालक आणि शेतकरी भूसंपादनाला विरोध करत आहेत. त्यामुळे हा विरोध दूर करून भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करणे प्रशासनाला एक मोठे आव्हान ठरण्याची शक्यता आहे. भूसंपादनासाठीच्या तसेच प्रकल्प बांधकामासाठीच्या निधी जमा करण्यासाठी एमएसआरडीसीला मोठी कसरत करावी लागणार आहे. कारण, अगोदरच या प्रकल्पासाठीचा खर्च १२ हजार कोटींवरून ३९ हजार कोटींवर गेला आहे. हा निधी जमवण्यासाठी बँका तसेच इतर सरकारी यंत्रणांची, अर्थात एमएमआरडीए, सिडको, म्हाडा, एमआयडीसी यांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी नऊ सदस्यांची एक समितीही नेमली आहे. तेव्हा हे आव्हान एमएसआरडीसी कसे पेलते, हे पाहणेही महत्त्वाचे आहे. प्रकल्प रखडला असल्याने आधी भूसंपादन आणि परवानगीची प्रक्रिया आणि मग प्रकल्पाला सुरुवात, असे हे धोरण आहे. त्यानुसार ही सर्व प्रक्रिया वर्षभरात पूर्ण करून २०२३ मध्ये प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्याचा मानस आहे. खरोखरीच या प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत सुरु होते का, ते आता पाहावे लागेल. यातील पहिल्या टप्प्यात मोरबे ते करंजाडे या २० कि.मी.च्या मार्गाचे काम हाती घेतले जाणार आहे. रायगड जिल्ह्यात अनेक प्रकल्प आले, मात्र शेतकऱ्यांना योग्य मोबदला ज्यांनी दिला नाही, त्यांना शेतकऱ्यांच्या विरोधापोटी आपले प्रकल्प गुंडाळावे लागले. आता या महत्त्वाकांक्षी मुंबई व रायगडला जोडणाऱ्या एका महत्त्वपूर्ण सेतू प्रकल्प असलेल्या विरार-अलिबाग कॉरिडॉरचे काय होते, ते पाहावे लागेल. ■■




कवडसे

मंगल आठवले-गोगटे
९८२०००००२४

# पेयपान

अलिबागला गेल्यावर समुद्रकिनाऱ्याइतकं सुंदर, मन रिझवणारं आणि दिवसभर जिथे सहज घालवता येईल अशी जागा नाही. परंतु, अनेकांसाठी खाणं-पिणंही तितकंच महत्त्वाचं असतं. मांसाहारींसाठी ताजे मासे हे आकर्षण असतं. देवभोळ्यांसाठी अनेक देवळं आहेत. इतरांसाठी भेळ, नारळपाणी, ताडगोळे, पापड, घरगुती मसाले, बकुळीच्या फुलांचे सर आणि एकूण कोकणमेवा आहे.

आईसक्रीम सोडा हा पेय प्रकार अलिबागमधे केव्हा उदयाला आला कोण जाणे. परंतु, ज्याने-ज्याने तो चाखला, त्या प्रत्येकाला तो आवडलेला आहे. 'आईसक्रीमचा वास असलेला सोडा' असं त्याचं थोडक्यात वर्णन करता येईल. पण, त्याची क्रेझ ती केवढी! आता तिथे गेलं की, आईस्क्रीम सोडादेखील एक 'मस्ट' झालं आहे. आताच्या काळात अलिबागला जाणारी मंडळी कॅटॅमरान पकडतात वा 'रो - रो सर्व्हिस' पकडतात. त्यामुळे पळी येथील आईसक्रीम सोडा, त्याच्या अगणित प्रकारांसह, विकणारं दुकान जरा दृष्टीआड गेलंय. आणि, अलिबागमधलं 'डेविडचं दुकान' जरा प्रकाशात आलंय. अर्थात, आता डेविड हा इस्त्रायली गृहस्थ मायदेशी परत गेलाय. आणि त्याचं ते दुकान दुसराच कुणी चालवतो. तो 'दुसराच कुणी' पळीहून आईसक्रीम सोडा आणून तिथे विकत असावा, असा माझा होरा आहे. शिवाय, आता तिथे आईसक्रीम मिळत नाहीच. मला आठवतं त्याप्रमाणे काही वर्षांपूर्वी तिथे पायनापल सोडा मिळत असे, डेविडच्या काळात, तो आता नाही मिळत. इतर काही सोड्यासारखी पेयं तिथे मिळतात.

मला माहिती आहे ते तेच 'डेविड'चं दुकान. तिथे जायचं हा अलिबाग भेटीचा न ठरवलेला, पण कधीही न चुकणारा भाग होता. माझी मुलगी तर तिथे बसून मन भरेपर्यंत सोडा पित असे. आणि तिची आजी, म्हणजे माझी आई तिचा तो शौक पुरा करत असे. तिच्या लहानपणीचं ते एक मोठं आकर्षण होतं. ती बाटलीही खास मोठी नव्हती. एक व्यक्ती दोन बाटल्या सोडा सहज पिऊ शकेल एवढाच सोडा त्यात असे. काही काळानंतर तिने नवीन प्रकार शोधला. आईसक्रीम सोडा बरोबर आईसक्रीम खाण्याचा. त्याच दुकानात तिथे बनलेलं आईसक्रीमही मिळे. आधी ग्लासमध्ये एक गोळा आईसक्रीम घालून त्यावर हळूहळू सोडा ओतायचा वा ग्लासात आधी सोडा घेऊन मग त्यात थोडं-थोडं आईसक्रीम घालायचं. कसंही केलं तरी चव तीच. आमचं बघून आणखीही काही प्रवाशांनी तसं करून पाहायला सुरूवात केली त्यावेळी. आता माझी मुलगी मोठी होऊन नोकरी करू लागली. माझी आईदेखील घराबाहेर पडेनाशी झाली. आणि माझी अलिबाग भेट फक्त आईला भेटण्याएवढीच मर्यादित राहिली.




अलिबागच्या पत्रिकेत कुणा खंडू नामक व्यक्तीचं नाव लिहिलं आहे हे तो तिथे पोहोचण्याआधी कुणालाही खरं वाटलं नसतं. पण, तो तिथे आला आणि लोकांच्या नजरेत आला जेव्हा मारूती नाक्यासारख्या ऐन मोक्याच्या जागी त्याने उसाचं गुऱ्हाळ सुरू केलं. त्याने अलिबागकरांना उसाच्या रसाची सवय लावली. त्याआधी त्यांनी उसाचा रस प्यायला नव्हता असं नाही. वेगवेगळ्या जत्रांमध्ये तो त्यांच्या मुखी लागे. तिथे तर असं हाताने फिरवायचं वा आता असतं तसं इलेक्ट्रिकवर चालणारं मशीन नव्हतं, तर प्रत्यक्ष बैलाच्या मदतीने रस काढला जाई. तर खंडूने आम्हाला उसाच्या रसाची गोडी लावली. पावसाळ्यात तो त्याच्या गावी जाई आणि मग परत येऊन अलिबागकरांच्या सेवेतून पैसे कमावे. नंतर त्याने आईसक्रीम बनवायला सुरूवात केली. हाताने फिरवून बनवायच्या 'पॉट'मध्ये पातळ दुधाचं आईसक्रीम बनवायचा तो. १० पैशाला रस आणि २५ पैसे, म्हणजे चार आण्याला आईसक्रीम मिळायचं. एकाच प्रकारचं आईसक्रीम मिळायचं, पण मिळायचं. आतापर्यंत जी वस्तू फक्त मुंबईला गेल्यानंतरच मिळू शकत असे, ती आता कशी का असेना पण गावात मिळू लागली होती. आम्ही मुलं त्यावरही खुश होतो. बाहेर काढल्याबरोबर विरघळायला लागणारं ते आईसक्रीम आम्हाला स्वर्गीय वाटे. आता खंडूचं दुकान नाही तिथे आणि त्याचा पत्ता कुणालाच माहीत नाही. त्याला कुटुंब होतं की नाही, हे माहिती नाही. अलिबागमध्ये आता सगळ्या ब्रँडची आईसक्रीमस मिळतात.



परंतु, कुठलंही आईसक्रीम स्वर्गीय लागत नाही. बर्फाचा गोळा हे आणखी एक आकर्षण होतं. टणटण-टणटण असं वाजवत बर्फाच्या गोळ्याची गाडी आली दुपारी की तो खायची इच्छा व्हायलाच हवी. तसं तर कुठेही मिळतो तसा गोळा. परंतु, मी मात्र फक्त अलिबागमध्येच गोळा खाते. पण माहेरचा तो स्वच्छ आणि इतर ठिकाणचा अस्वच्छ अशी माझी मानसिकता व्हायचं काय कारण होतं? लग्नानंतरही तेच? कदाचित शाळेच्या दिवसात भोंडल्यात गात असलेलं 'आला माझ्या माहेरचा वैद्य' हे गाणं असू शकेल. त्यात आहे त्याप्रमाणे माहेरच्या वैद्याचं सगळंच छान आणि सासरच्या वैद्याचं सगळंच घाण, असं झालं होतं माझं. मुंबईत राहायला आल्यावर सुरूवातीला, मुंबईच्या लोकांना मचूळ वाटणारं पाणी मला मिळालं नाही प्यायला, तर तहान भागायची नाही. तसं गोळ्याचंही आहे. तो फक्त तिथलाच छान. अशाच एक-दोन गोष्टी आहेत ज्या न खाता, न विकत घेता मी अजूनही मुंबईला परत येत नाही. त्यांचा विचारही तोंडाला पाणी आणतो. एक म्हणजे, दुधी हलवा आणि दुसरी बर्फी. मुंबईकरांना फक्त गाजर हलवा माहिती आहे. त्यामुळे कदाचित माझं मन अलिबागच्या हलव्याकडे वळतं. आणि तिथे मिळणाऱ्या चवीची रवाळ बर्फी आणखी कुठेही मिळत नाही, यावर माझा दृढ विश्वास आहे. ■■

आदरांजली
बिजलाल सारडा

# सामाजिक बांधिलकी जपणारा उद्योजक

**उद्योगधंद्यात पैसा कमवणं हा मुख्य उद्देश असतो; परंतु वाडवडिलांनी सुरू केलेला उद्योग यशोशिखरावर नेत असताना सामाजिक बांधिलकी जपणारी फार थोडी घराणी असतात, त्यापैकी बजाज यांचंही घराणं होतं. स्वातंत्र्योत्तर काळातील पिढीचं प्रतिनिधित्व करणारं आणि त्याचबरोबर २१ व्या शतकाची आव्हानं समर्थपणे पेलणारं व्यक्तिमत्त्व म्हणून राहुल बजाज यांच्याकडे पाहिलं जात होतं. काँग्रेसी विचारधारेचे असले तरी प्रसंगी काँग्रेसच्या नेत्यांचे कान धरायलाही मागे-पुढे न पाहणारं व्यक्तिमत्त्व आता काळाच्या पडद्याआड गेलं आहे.**



देशातील आघाडीच्या बजाज उद्योग समूहाची धुरा तब्बल ५० वर्षे वाहणारे ज्येष्ठ उद्योगपती राहुल बजाज यांचं पुण्यात निधन झालं. अनेक दिवसांपासून ते कर्करोगानं त्रस्त होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते; मात्र उत्तरोत्तर त्यांची प्रकृती खालावत गेली होती. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. दुपारी ही बातमी प्रसिद्ध होताच त्यांच्यांशी निगडीत आठवणी जाग्या झाल्या. फिरोदिया, बजाज सारडा, धूत कुटुंबाचे संबंध सलोख्याचे होते. राहुल बजाज यांचा जन्म, सावित्री आणि कमलनयन बजाज या मातापित्यांच्या पोटी कोलकत्ता येथे दहा जून १९३८ रोजी झाला. बजाज हे मारवाडी कुटुंब. व्यावसायिक असलेल्या या मारवाडी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय संपन्न होती. राहुल यांचे आजोबा जमनालाल बजाज हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले स्वातंत्र्यसैनिक होते. राहुल यांच्या आजोबांना महात्मा गांधी आपला पाचवा पुत्र मानत असत. जमनालाल बजाज हे जवाहरलाल नेहरू यांचेही खूप जवळचे मित्र होते. काँग्रेस पक्षाच्या उभारणीत व राष्ट्रीय चळवळीत त्यांचं योगदान महत्त्वाचं होतं. बजाज आणि नेहरू या घराण्याचे गेल्या तीन पिढ्यांचे कौटुंबिक संबंध आहेत. कमलनयन आणि इंदिरा गांधी दोघे काही काळ एकाच विद्यालयात शिकत होते. कमलनयन यांच्या पहिल्या अपत्याचे राहुल हे नाव स्वतः जवाहरलाल नेहरू यांनी सुचवलेलं आहे. राहुल यांचं बालपण अतिशय शिस्तीच्या वातावरणात गेलं. गांधी आणि बजाज कुटुंबातील घरोब्याचे अनेक किस्से आहेत. राहुल बजाज यांचा जन्म झाला, तेव्हा इंदिरा गांधी कमलनयन बजाज यांच्या घरी गेल्या. माझी एक अतिशय मौल्यवान गोष्ट तुम्ही घेतलीत, अशी तक्रार त्यांनी कमलनयन यांच्या पत्नीकडं केली. ही गोष्ट होती- 'राहुल' हे नाव. हे नाव पंडित नेहरूंना आवडलेलं होतं आणि इंदिरांनी आपल्या मुलाचं नाव राहुल ठेवावं, असं त्यांना वाटत होतं; पण नेहरूंनी त्यांच्या डोळ्यांसमोरच लहानाच्या मोठ्या झालेल्या कमलनयन बजाज यांच्या मुलाचं नाव राहुल ठेवलं. असं म्हटलं जातं की इंदिराजींनी राजीव गांधींच्या मुलाचं नाव 'राहुल' ठेवण्यामागं हेच कारण होतं. कारण हे नाव त्यांच्या वडिलांच्या आवडीचं होतं.

कमलनयन हे महात्मा गांधींच्या वर्ध्यातील संन्याशी आश्रमात वाढले. कमलनयन यांचे बंधू रामकृष्ण बजाज यांचं शिक्षण वर्धा येथील नवभारत विद्यालयात चालू असतानाच स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याकरिता त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला. त्यांनी १९४०-४५ यांदरम्यान तीन वेळा कारावास भोगला. त्यांचे थोरले बंधू कमलनयन यांच्या निधनानंतर बजाज उद्योग समूहाची सूत्रं रामकृष्णजींकडे आली. बजाज उद्योगाचा विकास करतानाच त्यांनी बजाज फाऊंडेशनमार्फत जनसेवा चालूच ठेवली. तोच वारसा राहुल यांनी पुढं चालवला. ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागांत आरोग्य व शिक्षण सुविधा पोहोचण्यावर त्यांनी भर दिला. पुढं हे कार्य राहुल बजाज यांनी पुढं चालू ठेवलं.

बजाज कुटुंब कायम पुरोगामी विचाराचं. राहुल यांचा विवाह रूपा घोलप या महाराष्ट्रीयन तरुणीशी १९६१ साली झाला. रूपा या त्या काळातील सौंदर्यवती व नवोदित मॉडेल होत्या. मारवाडी कुटुंबात त्या वेळी आंतरजातीय विवाह होत नव्हते. तो पुरोगामीपणा राहुल यांनी दाखविला. राहुल बजाज यांनी बजाज उद्योग समूहाचं अध्यक्षपद भूषवलंच; शिवाय राज्यसभेचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केलं. त्यांना २००१ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. कोरोना विरोधातल्या या लढ्यात बजाज उद्योग समूहानेही आपलं योगदान दिलं. कोरोना विरोधातील लढ्यासाठी बजाज उद्योग समूह शंभर कोटी रुपये देत असल्याची घोषणा या उद्योगाचे प्रमुख राहुल यांनी केली होती. त्यातून त्यांची सामाजिक बांधिलकी दिसून आली. सरकार आणि आम्ही काम करत असलेल्या देशातल्या दोनशेहून अधिक स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून हा पैसा जास्तीत जास्त गरजू लोकांपर्यंत पोहोचेल याची काळजी आम्ही घेऊ, असं राहुल यांनी म्हटलं होतं. राहुल बजाज आणि शरद पवार यांची मैत्री होती. पवार यांनी राष्ट्रपती व्हावं, असं त्यांना वाटत होतं. त्यांनी जाहीरपणे तसं सांगितलंही होतं. त्यांचा सेवाभाव कायम लक्षातच राहणारा आहे. कोरोनाच्या काळात पुण्यासह, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही त्यांनी मदत केली. हातावर पोट असणाऱ्या आणि मजुरी करून जगणाऱ्या कामगारांसाठी, बेघर आणि पदपथावर राहणाऱ्या मुलांसाठी अन्न आणि निवाऱ्याची सोय करण्यासाठी काही संस्थांसोबत बजाज कंपनीने काम केलं. ग्रामीण भागातल्या लोकांचं जगणं सुसह्य करण्यासाठी थेट अनुदान, रोजगार संधींसाठी प्रयत्न केले.

राहुल बजाज यांनी गेल्या वर्षी २९ एप्रिल रोजी बजाज ऑटोच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. वयाचं कारण देत त्यांनी हे पद सोडलं. १९७२ पासून ते या पदावर होते. त्यानंतर राहुल बजाज यांना कंपनीचे अध्यक्ष एमिरेट्स म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. सीआयआयच्या बंद खोल्यांमध्ये होणाऱ्या बैठकांमध्ये उद्योग जगताच्या अडचणींविषयी काळजी व्यक्त व्हायची. मात्र, त्याविषयी खुलेपणाने कोणीही बोलत नव्हतं; परंतु उद्योजकांच्या अडचणीविषयी तसंच सामाजिक प्रश्नांविषयी राहुल बजाज कायम बोलत राहिले. काँग्रेसचं सरकार असताना ते जसं त्यांच्या उद्योगविषयक धोरणावर टीका करीत राहिले, तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून उद्योजकांचा अपेक्षाभंग व्हायला लागला, तेव्हाही त्यांनी परिणामाची भीती न बाळगता सरकारच्या धोरणावर टीका केली. राहुल यांनी भाजप सरकार प्रमाणंच इतर सरकारांवरसुद्धा परखड टीका केलेली आहे. ते वेळोवेळी सरकारच्या धोरणांवर बोलत असत; पण त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना विचारलेल्या प्रश्नावरून त्यांना मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आलं. राहुल बजाज यांचं वक्तव्य म्हणजे फक्त एका कार्यक्रमात विचारलेला प्रश्न नसून त्यामागं काही वर्षांपासूनची अस्वस्थता होती. सरकारनं काळ्या पैशावर कारवाई करण्यासाठी पावलं उचलली. पण याबाबत उपाययोजना करत असताना त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्यामुळं उद्योजकांना समस्यांना तोंड द्यावं लागत होतं. यामुळेच राहुल बजाज अस्वस्थ होते. त्यांची नाराजी वेळोवेळी दिसून आली. राहुल बजाज रोखठोक बोलत. विविध प्रसंगी त्यांनी सरकारविरोधात प्रश्नही उपस्थित केले होतं. तसंच प्रतिस्पर्धी कंपन्यांच्या विरोधातही त्यांनी कणखरपणा दाखवला होता. पियाजिओ कंपनीसोबत कराराचं उल्लंघन केल्याचं प्रकरण त्याचं उत्तम उदाहरण. राहुल बजाज यांनी आपल्या रोखठोक स्वभावाला कधीही आवर घातला नाही. त्यांनी आपली मतं परखडपणे मांडली. राहुल यांच्या जाण्याने उद्योगविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. उद्योगविश्वासाठी, उद्योगजगतासाठी आवाज उठवणारा उद्योगजक काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली ही पोकळी भरून निघणं खरंच खूप अवघड आहे.

**(लेखक प्रसिद्ध उद्योजक आहेत.)** ■■

विशेष

श्रद्धा वार्डे
९७६७१५२६०८

# चीनचे सामर्थ्य वाढतेय

चीन, इराण आणि रशियाच्या नौदलांनी संयुक्त सराव नुकताच उत्तर हिंद महासागरात पार पडला. अमेरिकेबरोबर तणाव वाढत असल्याने तिन्ही राष्ट्र एकत्र येताना दिसत आहेत. रशियन नौकांबरोबरच चिनी आणि इराणी नौका यामध्ये सहभागी झाल्या होत्या. ११ इराणी नौका, तीन रशियाच्या नौका आणि दोन चिनी नौका सहभागी झाल्या होत्या. इराणी परराष्ट्र व्यवहार मंत्री अमीर अब्दोल्लाहीन यांनी चीनला पण नुकतीच भेट दिली, या भेटीनंतर दोन्ही देशांत आर्थिक आणि राजकीय सहकार्य करार करायचं जाहीर केलं. २५ वर्षांसाठी हा करार असेल.

चीनचा मध्य आशियातील वावर वाढला आहे. चीन, मध्य आशियातील देशांच्या सैन्याना प्रशिक्षण देत आहे तसंच संयुक्त सैन्य सराव पण घेत आहे. या माध्यमातून चीन लष्करी क्षमता वाढवत आहे. मध्य आशियातील कमजोर राष्ट्रांबरोबर चीन लष्करी संबंध वाढवत आहे. मध्य आशिया रशियाच्या प्रभावाखाली असल्याचं मानलं जातं. अमेरिकेने या प्रदेशात रस घेतला आणि २००५ मध्ये उझबेकिस्तान मध्ये आणि २०१४ मध्ये किर्गिझिस्तानमध्ये लष्करी तळ सुरु केला. त्यानंतर चीनचा मध्य आशियातील रस वाढला. चीनने रशियाची कमतरता भरून काढली असं म्हणायला हरकत नाही. २०१७ मध्ये चिनी लष्करी तर जिबूतीमध्ये सुरु झाला. बेल्ट आणि रोड प्रकल्पात सहभागी देशांबरोबर चीन लष्करी संबंध वाढवताना दिसत आहे. चीनच्या मध्य आशियातील अस्तित्वाचे परिणाम काय होतील? मध्य आशियातील चीनच लष्करी अस्तित्त्व दीर्घकाळ असेल का? असे काही प्रश्न निर्माण होतात.

चीनच्या मध्य आशियातील अस्तित्वामुळे धोका निर्माण होऊ शकतो. चीनला जगभर प्रभाव निर्माण करायचा आहे. चीनचा भूराजकीय स्वार्थ वाढत पूर्ण करण्यासाठी लष्कराची मदत आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक संबंध प्रस्थापित करणे या चीनच्या धोरणात बदल झाला असून आता आर्थिक आणि लष्करी धोरण असं चीनच नवीन धोरण झालं आहे. २०१५ मध्ये षी जिनपिंग यांनी लष्करी राजनयाला प्राधान्य देण्यास सुरुवात केली. चीनच्या मध्य आशियातील अस्तित्वाला पण धोका आहे. तो म्हणजे मध्य आशियातील बेल्ट रोड प्रकल्पांवर हल्ला होऊ शकतो. मुस्लिम बहुल शिनचियांग प्रांतात कट्टरता वाढू शकते. त्यामुळे बेल्ट रोड प्रकल्पांच्या सुरक्षेचा विचार करत आहे. चिनी प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगार वाढेल असं आश्वासन चीनने दिलं होतं. पण तसं काही होताना दिसलं नाही. त्यामुळे मध्य आशियातील नागरिकांचा राग वाढत आहे. ताजिकिस्तान आणि किर्गिजिस्तान मधून शिनचियांग प्रांतात दहशतवाद पसरेल अशी भीती पण चीनला वाटत आहे. २०१९ मध्ये कझाकस्तानमध्ये इस्लामिक स्टेट संघटनेशी संबंध असल्यावरुन ५०० जणांना ताब्यात घेतलं होतं तर दहशतवादी कृत्यांमध्ये सहभाग घेतल्याने १४ जणांना अटक करण्यात आली होती. चीन कझाकस्तान तुर्कमेनिस्तान इराण या रेल्वे मार्गाला धोका संभवतो. चीन मध्य आशियातील लष्करी अस्तित्व वाढवत आहे.

गेल्या पाच वर्षात मध्य आशियात चीनने १८ टक्के शस्त्र पुरवठा केला आहे. तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तानमध्ये शस्त्र पुरवठ्यामध्ये चीनने रशियाला मागे टाकलं आहे. मध्य आशियातील देशांना आधुनिक शस्त्र सामग्री चीनकडून मिळते. यामध्ये अत्याधुनिक ड्रोनचा समावेश आहे. २००२ पासून चीन किरीगीजीस्तान यांच्यात संयुक्त लष्करी सराव होत आहे. दहशतवादाला विरोध हा या सरावाचा मुख्य हेतू आहे. रशिया आणि चीन यांच्यात १० संयुक्त लष्करी सराव झाले. संयुक्त लष्करी सरावाबरोबरच चीन मध्य आशियातील देशांना लष्करी प्रशिक्षण पण देत आहे. २००० साली चीनने १५ कझाक लष्करी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिलं होतं. २०१० पर्यंत हा एकदा ६५ पर्यंत गेला. गेल्या पाच वर्षात ३० किरगीजी अधिकाऱ्यांना लष्करी प्रशिक्षण दिलं होतं. २०१६ मध्ये कझाकस्तान लष्करी विद्यापीठात चिनी विभाग सुरु करण्यात आला. उझबेक सुरक्षा प्रबोधिनी आणि चिनी लोक सुरक्षा विद्यापीठ यांच्यात २०१७ मध्ये सामंजस्य करार झाला. २०१६ मध्ये चीन आणि ताजिकिस्तान यांच्यात दोन्ही देशांच्या सीमेवर ११ ठिकाणी सुरक्षा चौक्या निर्माण करण्या संदर्भात करार झाला. यानंतर उपग्रह छायाचित्रांमधून मिळालेल्या माहिती नुसार सीमेवर एक हजार जवान तैनात असल्याचं दिसून आलं. २०२१ चीनने ताजिकिस्तान सीमेवर विमानतळ सुरु केलं. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या अहवालानुसार चीनचा दुसरा लष्करी तळ हा ताजिकिस्तानमध्ये असेल. चीनचा मध्य आशियातील अस्तित्व वाढत आहे याच एक कारण बेल्ट रोड प्रकल्पाची सुरक्षा हे आहे आणि दुसरं म्हणजे आफ्रिकी देशांप्रमाणे मध्य आशियांत प्रभाव निर्माण करणे हा आहे.

मुक्तच्छंद

प्रा. शाम जोगळेकर
९२७३३४३१७७

# खंतावणाऱ्या गोष्टी





व्यक्ती आणि समाज यांचे अतूट नाते असते. आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाचे आणि आपले काही प्रश्न समान असतात तर काही भिन्न. समाजाचे कल्याण झाले तर बहुसंख्य व्यक्तींचे कल्याण साधले जाते. व्यक्तीच्या जन्मापूर्वीही समाज होता आणि एखादी व्यक्ती मरण पावली तरी समाज टिकूनच असतो. व्यक्ती आणि समाज यांचे कल्याण परस्परावलंबी असते. व्यक्ती आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या हिताला नेहमीच प्राधान्य देते, मात्र सामाजिक प्रश्नांकडे आणि सामाजिक कर्तव्यांबाबत दुर्लक्ष केले जाते. परिणामी व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात मोठी तफावत दिसून येते. घरातील स्वच्छतेला आपण जेवढे महत्त्व देतो, तेवढेच घराबाहेरील स्वच्छतेकडे, आपल्या देशात तरी सरसकट दुर्लक्षच केले जाते. कारण ते काम सार्वजनिक संस्थेचे, जसे ग्रामपंचायत किंवा महानगरपालिका यांचे असते; म्हणजेच माझे किंवा आमचे नसते.

घराबाहेर सकाळी किंवा संध्याकाळी बाहेर जातो तेव्हा हे सारे जाणवते. कधी काही संवाद कानावर पडतात आणि मन अंतर्मुख होते. एकदा दोन व्यक्ती, रस्त्यात गप्पा मारताना आपल्या वरिष्ठाला दोष देत होत्या. 'सारखे काम करा.... मला हे त्यांचे वारंवार सांगणे अजिबात आवडत नाही.' त्यावर दुसरा म्हणाला, साहेबाला काल ठणकावून सांगितले, **हे माझे काम नाही आणि माझे काम मी करणार नाही.** कायम झालेलाच कर्मचारीच असे सडेतोड आणि बेजबाबदार उत्तर देईल! हा संवाद आपल्या समाजाचे जणु प्रतिनिधित्वच करतो आहे असे वाटते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत अशा अनेक खटकणाऱ्या गोष्टी जाणवतात. छोट्या-मोठ्या शहरांत चालणाऱ्या सुजाण नागरिकांना हे नेहमीच जाणवते. वृत्तपत्रांतून हे सारे बातम्यांमधून आणि पूरक छायाचित्रांमधून आपल्यापर्यंत नेहमीच पोहोचत असते. व्यंगचित्रांनाही त्यामुळे विषय मिळतात. पण परिस्थिती मात्र, "जैसे थे!" रस्त्यावरून फिरताना, लहान, मोठ्या सर्व रस्त्यांवर चारचाकी आणि दुचाकी स्वयंचलित गाड्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला कायम उभ्या असतात. त्यापैकी काही कायमच मुक्कामी, पण भंगार अवस्थेतील. त्यामुळे पादचाऱ्यांना आपला जीव मुठीत धरून, चालू आणि बंद गाड्यांच्या चक्रव्यूहातून जपून चालावे लागते. रस्ता, ही सार्वजनिक मालमत्ता पादचाऱ्यांना चालण्यासाठी की बंद वाहनांच्या विश्रांतीसाठी! लक्षावधी रुपयांच्या या गाड्या रस्त्यांवर कायमस्वरूपी असल्याने, गाड्यांचे खरे म्हणजे मोठे नुकसानच होते. पण त्याची कारमालकांना जाणीवच दिसत नाही. परंतु आता कोरोनोत्तर वेगवान आर्थिक प्रगतीमुळे (?) नवीन मोटारींच्या खरेदीसाठी नवीन रस्ते बांधण्याची गरज निर्माण होईल. परिणामी रोजगार वाढून गरीबी हटेल आणि श्रीमंतांची गाड्यांची हौसही भागेल. प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नसते.नियम कडक पण कारवाई शून्य. काहीवेळा दीर्घकाळनंतर रस्ता रुंदीकरण केले जाते आणि नवीन रस्ता पुन्हा गाड्यांनी (कायमच्या विसावलेल्या!) व्यापला जातो. गर्दीच्या वेळी बाजारात सर्वजण दुचाकी, चारचाकी गाडीतून येतात. गाडी जवळच थांबवतात आणि आपले चालण्याचे श्रमही वाचवतात. वाहतूक सुरळीत म्हणजे केवळ धावणारी वाहने ट्राफिकजॅममध्ये नाहीत. पादचाऱ्यांच्या त्रासाचा, सुरक्षेचा विचार कोणीच करीत नाही. कारण हाही आपला सामाजिक प्रश्न, पण **माझा** नाही!

ग्रामीण, शहरी भागांत आता रस्तोरस्ती पथदिवे रात्रीच्या वेळी प्रकाशमान होतात. परंतु जागरूक नागरिकांनी वारंवार सूचना करूनही हे पथदिवे अहोरात्र किंवा दीर्घकाळ गरज नसतानाही सुरूच असतात. मौल्यवान वीज खर्ची पडते. शेवटी त्याचा भार कळत-नकळतपणे करदात्यांवरच पडतो. गल्लीतील हा साधा प्रश्न वर्षानुवर्षे न सुटल्याने पुढे काय होते? याचा प्रत्यय जानेवारी महिन्यातील अखेरच्या आठवड्यातील एका बातमीमुळे आला.

आपल्या प्रगतिशील महाराष्ट्र राज्याच्या ऊर्जामंत्र्यानी सांगितले की, थकबाकीमुळे महावितरण संकटात सापडले आहे. परिणामी सार्वजनिक पाणीपुरवठा, राज्यातील सर्व ठिकाणचे पथदिवे यांचा वीज पुरवठा बंद होणार आहे. पुढील थकबाकीची रक्कम कोटी रुपयांमध्ये आहे. कृषीपंप ४१,१७५, पथदिवे ६३१६, सार्वजनिक पाणीपुरवठा २६०७, शासनाकडील थकीत अनुदान ७१७८. या सर्व आकड्यांची बेरीज केल्यास एकूण थकबाकीचा भयावह हिमालयच उभा राहील. निवडणुकांपूर्वी मतदारांना भुलवण्यासाठी, अनावश्यक आणि पूर्तता न होणारी अवास्तव आश्वासने दिली जातात. परिणामी वीज, पाणी या जीवनावश्यक गोष्टीच आपल्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातून अदृश्य होण्याची भीती निर्माण होते. काहीतरी थातुरमातूर उपाय करून, प्रश्नाचे भिजत घोंगडे तसेच राहते; उलट ते आणखीनच फुगत जाते. विजेची नियमित बिले भरणारे नागरिक भरडले जातात. वीजटंचाई आणि महागडी वीज आणि पर्यावरणाचा होणारा प्रचंड विध्वंस यांची सामाजिक जाणीवही दिसत नाही.

गल्लीपासून दिल्लीपर्यंत, अनेक सण समारंभ व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर, प्रामुख्याने रस्त्यांवरच साजरे होतात. सर्व धर्माचे नागरिक त्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सामील होतात. त्याकाळात रात्रंदिवस वीज रोषणाई सुरू असते. ध्वनिवर्धकांच्या प्रचंड आवाजामुळे आणि कोलाहलामुळे आणि अन्य त्रासांमुळे जवळपासचे नागरिक अधिक सहनशील आणि शांतताप्रेमी होतात. त्यानंतर रस्त्यांच्या झालेल्या कचराकुंडीची कुणालाच पर्वा नसते. कारण स्वच्छता करण्याचे त्यांचे कर्तव्य कधीच नसते.


सकाळी काही ज्येष्ठ नागरिक फिरायला जातात. काही घरी येताना दूध, पेपर आणतात तर काही दुसऱ्यांच्या आवारातील फुले, रस्त्यांवरून जाताना खेचून आणून आपल्या देवांवर पूजेचे वेळी अर्पण करतात आणि आपला व्यक्तिगत पुण्यसंचय करतात; तर काही मैत्रिणींना खुश करतात. एकदा संध्याकाळी आम्ही दोघे, पती-पत्नी फिरायला गेलो होतो. तेव्हा कोपऱ्यावरील कचऱ्याकडे लक्ष गेले. गल्लीतील पंधरा स्थिरावलेली वाहनेही दिसली. आपल्याला फक्त अवतीभोवतीचे दोषच दिसतात की काय असे वाटले. त्याच वेळी बदामाच्या झाडांवरील सरत्या सूर्यकिरणांच्या प्रकाशात न्हाणाऱ्या, तांबड्या-हिरव्या मोठमोठ्या पानांनी लक्ष वेधले. आंब्याचा मोहोरही दिसू लागला होता. त्याचा गंधही जाणवला. सृष्टीच्या या बदलत्या रूपाने आणि दर्शनाने, काही काळ तरी भवतालच्या सामाजिक प्रश्नांचा विसर पडला, हे मात्र खरे!

शब्दगंधा

शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

# एक आनंदी चेहरा

ज्यांच्या चेहऱ्यावरील आनंद कधीच अस्ताला जात नाही अशी काही माणसं पहायला मिळतात.. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाचा भाव, त्यांची आनंदी देहबोली, त्यांचे खळखळून हसणे, त्यांचे मोठ्या आवाजातील गप्पिष्ट बोलणे, हे पाहिले की त्यांचा खरंच हेवा वाटावा, दुःखी चेहऱ्यावर हास्य फुलावे, असे असते खर. या माणसांच्या नशिबात औषधालाही दुःख नसावे की काय अशी मनात पाल चुकचुकते. पण खरे तर तसे नसते. सगळ्या प्रकारची दुःखे आनंदाने झेलत ही माणसं आनंदात जगत असताना दिसतात. एवढी सगळी प्रस्तावना केली ती अशा अनेक व्यक्तींपैकी एक, ज्यांना मी जवळून गेली तीस पस्तीस वर्षे पहातोय ती व्यक्ती म्हणजे ज्यांना आम्ही माई म्हणतो, कुणी त्यांना बाई म्हणतात कुणी ताई



तर कुणी आई सुध्दा! वय वर्षे सुमारे ऐंशी.ठेंगणा बांधा,पूर्वीच्या स्थूल प्रकृतीच्या, आता थोड्या कृश झालेल्या, निवृत्त शिक्षिका, मुखी सदा हास्य. खूप ओळखी जपणाऱ्या, सगळ्यांची चौकशी, विचारपूस करणाऱ्या,प्रत्येक क्षण आनंदाने साजरा करणाऱ्या.तसं कुटूंब मध्यमवर्गीय पण सुखी. मुलींची लग्ने झाली, त्या सासरी गेल्या.

कोरोनाचा काळ येण्यापूर्वीच त्यांना कर्करोगाने गाठले. कर्करोग झाला पण त्या असाध्य रोगाशी त्यांनी निकराची झुंज दिली, आनंदात जगण्याच्या त्यांच्या तीव्र इच्छेपुढे कर्करोगाला अक्षरशः शरणागती पत्करावी लागली आणि त्या खणखणीत बऱ्या झाल्या. त्यानंतर पतीचे अचानक निधन झाले. ते दुःख पचवून त्यांनी वृद्धत्वात एकाकीपण आले तरी लोकांमध्ये मिसळून, अध्यात्म, भक्ती, यामध्ये त्यांचे क्षण त्या साजरे करू लागल्या.

खरं तर प्रत्येक गोष्टीत त्यांचे साजरेपण दिसते. कोणतेही दुःख त्यांच्या वाटेलाच जायला भित असावे असे वाटते. फोनवर कोणाची चौकशी करतील,कोणाला काही सल्ला देतील,कोणाला एखादी नवीन रेसीपी सांगतील किंवा नवीन रेसीपीचं काहीतरी विचारतील असं नेहमीच चालू असतं. कंटाळा त्यांच्या वाटेला जात नाही. गाणयासाठी आवाज गोड असावाच लागतो असं काही त्यांचं नसतं.मग म्हणून त्या लहान होतील आणि शर आला तो धाऊन आला काळ या कवितेपासून घाल घाल पिंगा वाऱ्या या कवितेपर्यंत मोठ्या आवाजात गुणगुणतील.आता गुणगुणणे हे मोठ्या आवाजात असते की ते स्वगत असते याचे कोणतेही नियम त्यांच्यासाठी नसतात. त्या कवितांचा त्या खरा आनंद घेतात. आम्हा चाळकरी मंडळींना त्या घेत असलेल्या आनंदाचं अप्रूप आहे. रडगाणे या गाण्यापासून मात्र त्या कोसो मैल दूर आहेत. पेन्शन हे त्यांचं सध्याचं त्यांच्या उपजीविकेचे साधन. पण कुठलाही आनंद साजरा करण्यात काटकसर हा शब्दही त्यांच्या शब्द कोषात नाही. एकतीस डिसेंबरला सकाळीच त्यांनी 'अरे पोरांनो 'अशी साद घातली आणि चाळीतील दोन तीन पोरांवर वर्षाचा शेवटचा दिवस मस्तपैकी संध्याकाळी चाळीत साजरा करण्याची जबाबदारी टाकली. हे बघा आपण किती जण आहोत ? भेळ आणि आईस्क्रीम, आणायचं, किती पैसे लागतील? हे घ्या पैसे. संध्याकाळी अंगणात रात्री आठापर्यंत थंडीतही भेळ, आईस्क्रीमसह गाणी गप्पा चाळकऱ्यांचा आनंद सोहळा चालू होता. पंधरा ऑगस्ट असो की सव्वीस जानेवारी. सकाळी गरम गरम बटाटेवडे माईंचे असणारच. त्यांनी आयुष्यात एकच वेड जपलंय ते माणसांचं आणि आनंदात रहाण्याचं.

वयाच्या ऐंशीमध्येही त्या षोडशवर्षात असतात. दुःखाला त्या हरवतात,आजारपण, व्याधींची त्या तमा तर बाळगत नाहीतच पण त्यांची चांगली जिरवतात. आनंदात रहाण्याची त्यांची इच्छा शक्ती हेच त्यांचं बळ आहे. त्या स्वतः आनंदात राहून इतरांनाही आनंद देतात. हे असे आनंदी चेहरे आसपास असले की त्यांच्या केवळ असण्याने जगण्याचे बळ मिळत रहाते. सुख जवाएवढे आणि दुःख पर्वता एवढे या म्हणी घट्ट धरून काही लोक उगाचच गंभीर चेहरे करून जगत असतात. आपण कसे जगायचे रडत कुढत की गाणी म्हणत या कवीवर्य मंगेश पाडगावकर यांच्या कविते प्रमाणे ते आपण ठरवायचे असते. दुःख ते अगदी पर्वता एवढे का असेना त्यावर मात करून ते जवा एवढे करून आनंदाची पर्वत शिखरे काबीज करता येतील पण त्या साठी माईंसारखी आनंदाने जगण्याची इच्छा असायला हवी ती असली की चेहरे आनंदाने फुलतीलच की !

# सामाजिक चेतना जागवणारी दमदार 'गझलनाद'

व्यक्त होणे ही प्रबुद्ध मनाची गरज असते. माणूस विचार करू शकतो, म्हणूनच आजही दुर्लक्षित गावातून दमदार कवी लेखक पुढे येत आहेत. सिराज शिकलगार हे नव्या दमाचे गझलकार आहेत. सांगली जिल्ह्यातील आंधळी सारख्या लहान गावात जन्मलेले हे ऊर्जावान गझलकार.त्यांच्या नावावर अनेक पुस्तके आहेत. गझलनाद हा ८० गझलांचा गझल संग्रह आहे. संग्रहातले कुठलेही पान काढा तिथे तुम्हाला मनाला प्रभावित करणारी गझल वाचायला मिळेल, असं लेखन सामर्थ्य फार कमी लेखकांमध्ये पहायला मिळते, या संग्रहातील पहिल्याच गझलमध्ये ते म्हणतात

**रे सुखा तुजसाठी मी किती तडजोड केली**
**जीवनाच्या मूल्यांची किती धरसोड केली**

ही रचना जीवनातील वास्तवता दर्शविते. आपल्या निर्णयावर कधीच ठाम नसलेली आपण खूप माणसं पाहतो, विसंगतीने भरलेले हे लोक विश्वासाला पात्र नसतात, सिराजनी एकतर्फी प्रेम करणाऱ्या मजनूची विकेट घेतली आहे, तिचे लग्न झाले तरी हा मजनू तिची वाट बघत असतो. अल्पाक्षरी गझलेतही कवी "करतब" करून जातो---

**नसून ती तो फसून आहे**
**अजून हृदयी ठसून आहे**
**लगीन झाले तिचे तरी हा**
**अजून कैसा बसून आहे**

सिराजजी वंचित दुर्लक्षित उपेक्षितांची तरफदारी करणारे गझलकार आहेत. त्यांच्या संग्रहात प्रेम, कुटुंब, विरह, सामाजिक जाणीव असे सर्वंकश विषय येतात.

फारशी, उर्दूतून गझल हा काव्यप्रकार मराठीत आला, प्रथम माधव ज्युलियन यांनी हा प्रकार मुक्तपणे हाताळला. बऱ्याच वर्षानंतर कविश्रेष्ठ सुरेश भटानी तंत्रशुद्ध गझल लिहून तिला लोकप्रिय बनवलं, एवढेच नव्हे तर त्यांनी आपला शिष्य वर्ग तयार करून त्यांचे रचनावर संस्कार केले. गझल म्हटले की साकी, शराब,शबाब,मुजरा हे ठरलेलं असं काव्य रसिकाना वाटायचं, पण मरहूम बशीर बद्र यांनी गझलेला सामाजिक गणवेश चढविला, सुरेश भटानी विविध विषयांचा प्रांत गझलेसाठी खुला केला. मी बशीर बद्र यांची दीर्घ मुलाखत घेतली होती. बशीर बद्र म्हटले की रसिकांना त्यांच्या --

**उजाले अपनी यादों के पास रहने दो**
**न जाने किस गली मे जिंदगी की शाम हो जाये**

या ओळी हमखास आठवतात.


सुरेश भटांच्या ---

**रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा**
**गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा**

या ओळी अनेकांच्या जिभेवर विराजमान होतात. सिराज शिकलगार नीज माझ्या पाडसा या गझलेत म्हणतात --

**झोप का रे आसमंती पसार जाहली**
**नीज माझ्या पाडसा रात्र फार जाहली**

गझलकार जणू विरह सहन करणाऱ्यांना, नैराश्य आलेल्यांना समजावून झोपायचा सल्ला देत आहे, तारका मंद झाल्या, चंद्र विसावला' तरी पाडसाला झोप का येत नाही, या प्रश्नाने गझलकार अस्वस्थ आहे. सिराजजी अभ्यासू आणि जिज्ञासू गझलकार आहेत. त्यांनी गझलमधील शेर, मतला, मक्ता इत्यादी शब्दांची सविस्तर उकल करून गझल लिहिली आहे. प्रियेला प्रसन्न करण्यासाठी, प्रियेला लुब्ध करण्यासाठी सिराजजीनी गझल लिहिली,




पुस्तक परिक्षण
डी.बी.जगत्पुरीया

त्यात ते म्हणतात----

**सांग प्रिये तुझ्यासाठी गीत कोणते गाऊ**
**मन तुझे जिंकण्यासाठी रीत कोणती लावू**

गझल झपाट्याने लोकप्रिय झाली आहे. आता अखिल भारतीय साहित्य संमेलनातही तिला स्थान मिळू लागले आहे. अनेक नव्या दमाचे गझलकार पुढे येत आहेत. ही बाब स्वागत करावी अशीच आहे. गझलने मराठी साहित्याच्या दालनात आपलं स्थान निर्माण केले आहे. ज्यांच्या कवितेला भिक्षा मागून ही दाद मिळत नाही असे स्वनाम धन्य कवी गझल म्हणताच नाक मुरडतात, त्यांचे विकारग्रस्त मन गझलेला दाद देत नाही. चांगल्याला चांगलं म्हटलं पाहिजे---

**गाळताही येत नाही टाळताही येत नाही**
**आसवांच्या या फुलांना माळताही येत नाही**

अशा समृद्ध ओळी ऐकल्यावर ज्यांच्या तोंडातून वा ! क्या बात है , छान ! अशी दाद निघत नाही तो रसिक कसला? दाद देणे, गुणांचा गौरव करणे सुसंस्कृत निरोगी मनाची गरज असते, मनाने रोगी असलेला माणूस कधीच कुणाचा गौरव करीत नाही. आज काल सिनेमा, इलेक्ट्रॉनिक मीडिया याचे प्रस्थ खूप वाढले आहे, त्यामुळे लग्नाअगोदर सुहागरात झाल्याचे किस्सेही कानावर पडतात, सिराजसारखा प्रखर संवेदनशील कवी अशा घटना गझलेचा विषय बनवतो, अशा महाभागांना शिकण्यासाठी कवीने गझल लिहिली असावी. सिराज लिहतात ---

**संयम किती माझा कुणाला कळला नाही**
**वासनेचा सैतान इकडे वळला नाही**

जो सत्कर्मात गढून जातो त्याचा आत्मविश्वास कधीच चळत नाही की विकृतीकडे ही वळत नाही. उतावळ, स्वकेंद्री माणसांना कवीने या गझलेत संदेश दिला आहे

**हर्ष भरला जरी भासतो जन्म तुझा माणसा**
**वर्ष भरता कमी भासतो जन्म तुझा माणसा**

आज काल वाढदिवस साजरा करण्याच्या कार्यक्रमाचे प्रमाण वाढले आहे पण वय एक वय वर्ष वाढल्यावर आपले आयुष्य एक वर्षाने घटत असते,याकडे कोणाचे लक्ष जात नाही, सिराज यांच्या ---

**हातास सखे तुझ्या चंदनाचा वास आहे**
**साथीत सखे तुझ्या जीवनाची आस आहे**

या मनभावन गझलेला कोण नावे ठेवील ?

**पुस्तकाचे नावः गझलनाद**
**गझलकार –सिराज शिकलगार**
**आंधळी.ता.पलूस.**
**जि.सांगली.(४१६३१०)**
**मोबा.नं.९८९०५९७८५५**
**किंमत–रु.१५०/–**
**प्रकाशक :ज्ञानसिंधू प्रकाशन, नाशिक**

ही गझल जीवन सहधर्मचारीणीचा सन्मान करणारी गझल आहे,जी दुःखात, वंचनेत साथ देते, ती खरी स्त्री असते. सिराज यांची गझल साध्या-सरळ शब्दात व्यक्त होते. या गझलेला मायभूचा गंध लगडलेला आहे. ते म्हणतात---

**साहित्यमूल्य माझे काढू नका कुणीही**
**आहे जगात आता माझाच बोलबाला**

या ओळी कविचा दांडगा आत्मविश्वास दर्शवतात, सिराज भंगलेले स्वप्न सांधणारा, प्रेमाची गाठ बांधणारा ऊर्जावान गझलकार आहे, या संग्रहातील माशूका वर लिहिलेल्या अनेक गझल आहेत

**तूच ओळख तुझे दौर्बल्य कोणते आहे**
**तूच ओळख तुझे प्राबल्य कोणते आहे**

लबाडीचा मार्ग माहीत नसलेला हा गझलकार कष्टाचे मूल्य चांगलेच जाणतो.

**हात नभास कुणी लावणार नाही**
**शीतल चंद्र कधी तावणार नाही**

असे ज्ञान देणारा रचनाकार विश्वासाने कुठल्याही विषयाला भिडतो. त्यातून अर्थाचे नवनीत निघते. कधी कधी माणसं विश्वासघात करतात, दगा देतात, घात-आघातही करतात, त्यातून कल्पक गझल निर्माण होते.

## कविता

### ती गेली आणि...

**मी काल अग्नीला**
**सूरांसवे जळतांना पाहिले !...**
**मी काल आसवांना सूरांसवे**
**ढळतांना पाहिले !...**
**ती गेली तेव्हा दरवळ तशीच**
**तिच्या स्वरांची...**
**मी काल आठवांना सुरांविना**
**तळमळतांना पाहिले !...**
**ती लगडलेले झाड स्वरांचे**
**सुरांनी बहरलेले...**
**मी काल वसंतात लतेचे पान**
**गळतांना पाहिले !...**
**तीचे स्वर्गातही असेल स्वागत**
**निश्चितच संगीतमय...**
**मी काल इथल्या प्रत्येकाला**
**हळहळतांना पाहिले !...**
**ती आहे...ती असेलच...हृदयी**
**विराजमान आमुच्या...**
**मी काल माझ्याच मनाला उगा**
**विरहाने छळतांना पाहिले !...**
**ती षड्ज...ती गंधार...ती पंचम...**
**कल्पवृक्षाचा सूर निखळ...**
**मी काल झंकार वीणेचे भैरवी**
**कडे वळताना पाहिले...**

– अभय पैर, ९७६८१८९३१५

# टीम इंडियाचा विंडीजला व्हाईटवॉश

## तिसऱ्या सामन्यासह मालिकाही जिंकली




। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

मुंबईकर श्रेयस अय्यर (१११ चेंडूंत ८० धावा), यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत (५४ चेंडूत ५६) यांची अर्धशतके आणि गोलंदाजांच्या सांघिक कामगिरीच्या बळावर भारताने तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडिजला ९६ धावांनी धूळ चारली. भारताने ही मालिका ३-० अशा फरकाने जिंकली. सामनावीर म्हणून श्रेयस अय्यर तर मालिकावीर प्रसिध कृष्णा यांचा सन्मान करण्यात आला.

भारताने दिलेल्या २६६ धावांचा पाठलाग करताना विंडीजचा डाव ३७.१ षटकांत १६९ धावांत आटोपला. मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा यांनी प्रत्येकी तीन बळी मिळवले. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय भारताच्या अंगलट आला. कर्णधार रोहित शर्मा (१३), विराट कोहली (०) यांना अल्झारी जोसेफने चौथ्याच षटकात माघारी पाठवले. तर अनुभवी धवनसुद्धा (१०) १०व्या षटकात बाद झाला. ३ बाद ४२ धावांवरून अय्यर आणि पंत यांनी चौथ्या गड्यासाठी ११० धावांची भागीदारी रचली. अय्यरने नववे, तर पंतने पाचवे अर्धशतक झळकावले. हेडन वॉल्शने पंतला बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर सूर्यकुमार यादवही (६) स्वस्तात परतला.

त्यामुळे अय्यरवरील दडपणात वाढ झाली आणि तोसुद्धा मोठा फटका खेळण्याच्या नादात वॉल्शच्या गोलंदाजीवर बाद झाला. मग सुंदर आणि चहर यांनी सातव्या गड्यासाठी ५३ धावांची भर घालून भारताला अडीचशे धावांपलीकडे नेले. जेसन होल्डरने मोहम्मद सिराजचा त्रिफळा उडवून भारताचा डाव ५० षटकांत २६५ धावांवर गुंडाळला. विंडीजने सातत्याने बळी गमावले. ८ बाद १२२ धावांवरून हेडन वॉल्श (१३) आणि जोसेफ यांनी ४७ धावांची भागीदारी करून भारताला झुंजवले.

### राहुल, अक्षर ट्वेन्टी-२० ला मुकणार

भारताचा उपकर्णधार के. एल. राहुल आणि डावखुरा फिरकीपटू अक्षर पटेल वेस्ट इंडिजविरुद्ध १६ फेब्रुवारीपासून रंगणाऱ्या तीन सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेला मुकणार आहे. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात राहुलच्या मांडीचा स्नायू दुखावला, तर अक्षर सध्या करोनातून सावरत आहे. महाराष्ट्राचा ऋतुराज गायकवाड आणि दीपक हुडा यांचा ट्वेन्टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात समावेश केला आहे.

### संक्षिप्त धावफलक

भारत : ५० षटकांत सर्व बाद २६५ (श्रेयस अय्यर ८०, ऋषभ पंत ५६; जेसन होल्डर ४/३४) विजयी वि. वेस्ट इंडिज : ३७.१ षटकांत सर्व बाद १६९ (ओडेन स्मिथ ३६; प्रसिध कृष्णा ३/२७, मोहम्मद सिराज ३/२९)

# क्रिकेटपटूंचा बाजार






## शिखर धवनवर पहिली बोली

## श्रेयस अय्यरसाठी सर्वाधिक १२.२५ कोटींची बोली

। बंगळुरू। वृत्तसंस्था ।

जगातील श्रीमंत टी-२० क्रिकेट लीग म्हणजेत आयपीएलच्या १५व्या हंगामासाठी दोन दिवस मेगा ऑक्शन होत आहे. शनिवारी महालिलावाचा पहिला दिवस होता. पहिल्या दिवशी १६१ खेळाडूंवर बोली लागली

यावेळी, मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्ज, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, सनरायझर्स हैदराबाद, राजस्थान रॉयल्स, पंजाब किंग्ज, कोलकाता नाइट रायडर्स, दिल्ली कॅपिटल्ससह लखनऊ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स हे दोन नवीन संघ लीगमध्ये सहभागी झाले आहेत. बंगळुरू येथे या महालिलावात एकूण ५९० खेळाडू आपले नशीब आजमावताना दिसतील.

फलंदाज आणि गोलंदाज यांच्यापेक्षा अष्टपैलू खेळाडूला आपल्या ताफ्यात सामील करुन मजबूत संघ बांधणी करण्यावरही फ्रँचायझी भर राहिल्याचे लिलावात दिसून आले.

| खेळाडू | बोली | संघ |
| --- | --- | --- |
| श्रेयस अय्यर | १२.२५ | कोटी केकेआर |
| ट्रेंट बोल्ट | ८ कोटी | राजस्थान रॉयल्स |
| रबाडा | ९.२५ कोटी | पंजाब |
| कमिन्स | ७.२५ कोटी | केकेआर |
| अश्विन | ५ कोटी | राजस्थान |
| धवन | ८.२५ कोटी | पंजाब किंग्ज |
| शिमरॉन हेटमायर | ८.५ कोटी | राजस्थान रॉयल्स |
| पॅट कमिन्स | ७.७५ कोटी | कोलकाता नाईट रायडस |

### मुंबईने बोल्ट गमावला

ट्रेंट बोल्टचा समावेश जगातील अव्वल गोलंदाजांमध्ये केला जातो. पॉवरप्लेमध्ये तो चांगली गोलंदाजी करतो. तसेच चांगले क्षेत्ररक्षण करण्यासाठीही तो ओळखला जातो. २०२० मध्ये मुंबई इंडियन्सने त्याला ३.२० कोटी रुपयांत खरेदी केले होते. त्यामुळे मुंबई इंडियन्सच्या संघासाठी हा एक मोठा धक्का समजला जात आहे. ट्रेंटला संघात घेण्यासाठी मुंबई इंडियन्साने प्रयत्न केले खरे, पण त्यांना अखेर ट्रेंट बोल्टला गमवावे लागले.

### सायलेंट टाय ब्रेकरचा नियम

जेव्हा दोन संघ लिलावात मटायफ करतील आणि त्या खेळाडूच्या बोलीसाठी त्यांचे सर्व पैसे लावतील, तेव्हा ते अंतिम मबंदफ बोलीची रक्कम जमा करू शकतात. ज्या संघाची सर्वाधिक बोली असेल, त्या संघाला संबंधित खेळाडू मिळेल. अतिरिक्त बोलीची रक्कम बीसीसीआयकडे जमा केली जाईल आणि ती ९० कोटींच्या रकमेचा भाग असणार नाही.

### लिवाल सुरू असतानाच ह्युज कोसळले

आयपीएल सुरू असतानाच ऑक्शेनियर एडमीड्स ह्युज एवाशरवशी जमिनीवर कोसळले. त्याला भोवळ आल्याची बातमी येत आहे. श्रीलंकेच्या हसरंगावर बोली लागत असतानाच ही घटना घडली. त्यामुळे लिलाव थांबवण्यात आला आहे. त्यांना काय झाले आहे याची माहिती अजून मिळालेली नाही. श्रीलंकेचा फिरकीपटू वानंदु हसरंगा याच्यावर बोली लावणे सुरू होते. हसरंगा १० कोटीपर्यंत पोहचला असतानाच बोली लावणारे ह्युज एवाशरवशी खाली कोसळले. ते खाली पडताना तोंडावरच पडल्याने त्यांना गंभीर जखम झाली असण्याची शक्यता आहे.

## म ह त्वा चे

### मनिकाला न्याय मिळाला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आघाडीची टेबल टेनिसपटू मनिका बात्राच्या लढ्याला अखेर न्याय मिळाला आहे. विश्वासार्हता गमावल्याचा ठपका ठेवत



भारतीय टेबल टेनिस महासंघाच्या कार्यकारिणीला निलंबित करीत प्रशासक नेमण्याचे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले आहेत. राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेती आणि खेलरत्न पुरस्कारप्राप्त बात्राने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती रेखा पल्ली यांनी हा निर्णय दिला आहे. मनिकाने दाखल केलेल्या सामनानिश्चितीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. सामनानिश्चिती करण्याची सूचना देणाऱ्या प्रशिक्षकाला संघटना पाठीशी घालत असल्याचे समितीच्या अहवालात स्पष्ट झाले आहे.

'क्रीडापटू देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करतात. त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य संघटनेचे आहे. ज्या व्यक्तींना खेळाडूंना कशी वागणूक द्यावी हे कळत नाही, त्यांनी बाहेर जाणेच योग्य ठरेल,'असे न्यायमूर्ती पल्ली यांनी निकालात म्हटले आहे. या निकालपत्रात न्यायामूर्तींनी प्रशासकाचे नावही नमूद केले आहे.गतवर्षी आशियाई टेबल टेनिस स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान न देण्यात आलेल्या मनिकाने राष्ट्रीय प्रशिक्षक सौम्यदीप रौय यांच्यावर आरोप करीत न्यायालयात धाव घेतली होती. रॉय यांनी त्यांच्याकडे खासगी प्रशिक्षण घेणाऱ्या एका खेळाडूसाठी मनिकाला ऑलिम्पिक पात्रता लढत गमावण्याची सूचना केली होती.

# मैदानात आहोत तोपर्यंत वादाची चर्चा होणारच

## रोहित शर्माचे स्पष्टीकरण



। मुंबई । प्रतिनिधी।

आम्ही जोपर्यंत क्रिकेट खेळत राहणार आहोत, तोपर्यंत रोहित आणि विराट या आमच्यातल्या वादाविषयीच्या चर्चा बाहेर होतच राहणार आहेत,असे कर्णधार रोहित शर्मा यांने म्हटले आहे.

भारतीय क्रिकेट संघात फूट पडल्याच्या अनेक चर्चा गेल्या काही काळात रंगल्याचं पाहायला मिळालं. विशेषत: विद्यमान कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट विराट कोहलीचं कर्णधारपद काढून घेतलं, ते पाहाता या दोघांमध्ये वाद असल्याची चर्चा अजूनही सुरूच आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमांनी विचारणा केली असता रोहित शर्मानं आपली नेमकी भूमिका स्पष्ट कली आहे.

विराट कोहलीनं टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा निर्णय जाहीर केल्यापासून रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यात वाद असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. विराटला एकदिवसीय कर्णधारपदावरून दूर केल्यानंतर रोहित शर्माची त्या ठिकाणी वर्णी लागली आणि या चर्चांना अधिक खतपाणी मिळालं. त्यापाठोपाठ विराट आणि बीसीसीआय यांच्यातील मतभद चव्हाट्यावर आल्यानंतर तर या चर्चांमध्ये तथ्य असल्याचंच लोकांना वाटू लागलं. मात्र खुद्द विराट कोहली आणि रोहीत शर्मा यांनी वारंवार असं काहीही नसल्याचंच स्पष्ट केलं आहे.

## लोना कंपनीत मनसेची संघटना



। महाड ।प्रतिनिधी।

महाड एमआयडीसीतील लोना कंपनीत आता मनसे कामगार संघटनेची स्थापना करण्यात आली असून,संघटनेच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. कामगार सेनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या उपस्थित कंपनीच्या गेट समोर श्रीफळ वाढवून युनियनची स्थापना केली आहे यावेळी मनोज चव्हाण, संदीप धुरी, प्रकाश पवार,देवेंद्र गायकवाड, चेतन उत्तेकर, यक्ष संपोष पार्टे इत्यादी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते तर लोना इंडस्ट्रिज लिमिटेड कंपनीचे कामगार उपस्थित होते

# पानथवणे क्रिकेट स्पर्धेस प्रतिसाद



। खारेपाट । वार्ताहर ।

जय गणेश पानथवणे आयोजित जिल्हास्तरीय भव्य टेनिस ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.स्पर्धेचे उद्घाघाटन उद्योजक अमित नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी प्रथम क्रमाकांचे ३५ हजार रुपये व द्वितीय २० हजार रुपये पारितोषिक अमित नाईक यांनी मंडळास दिले. तसेच सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

ही स्पर्धा आद्य सप्लायर्स म्हत्रोली येथील भव्य मैदानात तीन दिवस स्पर्धा खेळविण्यात येणार आहेत. स्पर्धेत जिल्ह्यातील संघ सहभागी होणार आहेत.

मंडळाच्या वतीने उद्योजक अमित नाईक यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रेय पाटील ,रोहिदास पाटील, अंकुश म्हात्रे, जालिंदर पाटील ,अभिजीत थळे ,निलेश ठाकूर, गणेश म्हात्रे मंडळाचे सर्व पदाधिकारी व इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती.

## रशिया-युक्रेन तणावाबद्दल सोशल मीडियावर चर्चा




वर्षा मेहता

। अलिबाग ।

रशिया युक्रेनवर केव्हाही आक्रमण करू शकतो आणि अमेरिकन नागरिकांनी ताबडतोब तेथून निघून जावे, असा इशारा अमेरिकेने दिला आहे. आक्रमणाची सुरुवात हवाई बॉम्बस्फोटाने होऊ शकते ज्यामुळे निर्गमन कठीण होईल आणि नागरिकांना धोक्यात येईल, असे व्हाईट हाऊसने शुक्रवारी सांगितले. हि बातमी प्रसारित होताच सोशल मेडियावर रशिया युक्रेनतणावा बद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.

सीमेजवळ १००,००० हून अधिक सैन्य जमा करूनही मॉस्कोने युक्रेनवर आक्रमण करण्याची कोणतीही योजना वारंवार नाकारली आहे. अमेरिकेच्या विधानाने जगभरातील देशांना युक्रेनमधील

### हॅशटॅग रशिया युक्रेन ट्रेंड

SOCIAL MEDIA पडसाद

नागरिकांना नवीन इशारे देण्यास प्रवृत्त केले. दरम्यान, रशियाने युक्रेनमधील आपल्या राजनैतिक कर्मचार्यांची संख्या ऑप्टिमाइज करण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

यूएस राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन म्हणाले की, रशियन सैन्य आता मोठी लष्करी कारवाई करण्यास सक्षम होण्याच्या स्थितीत आहे आणि यूएस अधिकार्यांच्या इशाऱ्यांच्या निकडीत स्पष्ट वाढ म्हणून पाहिले जाते. युक्रेनवर रशियन हल्ल्याच्या शक्यतेबद्दल चेतावणी देऊन अमेरिका आपल्या युरोपियन मित्र देशांसोबत आहे.

# रोह्याच्या कलिंगडांना उरणमध्ये भाव



। उरण ।वार्ताहर।

उन्हाचा तडाखा वाढण्यापूर्वी उरण बाजारात रोह्याचे गोल्डन शुगर गारेगार कलिंगड दाखल झाले असून नागरिक कलिंगड करतांना दिसत आहेत.ग्राहकाकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने व्यावसायिक देखील खूष झालेले आहेत.

कलिंगडाच्या हंगामाची सुरुवात जानेवारी महिन्यात होते.जूनपर्यंत हा हंगाम सुरु असतो.वकाळी पावसामुळे यंदा कलिंगडाचा हंगाम काहीसा लांबणीवर पडला. त्यामुळे पुढील आठवड्यात कलिंगडाची आवक आणखी वाढेल.उन्हाळ्यात मागणी वाढत आहे कलिंगड च्या आकारावरून किंमत ठरविली जाते लहानांत लहान १०० रुपये तर मोठे आकाराचे २१० रुपये अश्या भावाने आम्ही विकतो,असे कलिंगड विक्रेते निशिकांत मधुकर गुरव यांनी सांगितले.

> गडद हिरव्या रंगाची कलिंगड शुगर किंग ,गोल्डन शुगर या नावाने ओळखले जातात .फ्रुट सलाड आणि ज्युस बनविण्यासाठी हि कलिंगडे मोठ्या प्रमाणात वापरली जातात.जसजसे तापमान वाढते तशी कलिंगडा ना मागणी वाढत आहे.
> -मुक्ता शशिकांत गुरव,कलिंगड विक्रेती

## नांदगाव विद्यालयात जल पे चर्चा

। पाली/गोमाशी । वार्ताहर।

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान अंतर्गत संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव या विद्यालयात जल पे चर्चा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

प्रा सोनल ठकोरे यांनी प्रास्ताविक केले. .प्राचार्य साळुंखे यांनी जल संवर्धन तर तालुका समन्वयक धनंजय पाटील यांनी अभियानाची माहिती दिली.

क्रीडा शिक्षक संभाजी ढोपे,सहा शिक्षक प्रा सोनल ठकोरे,बबन पालवे, पांडुरंग सूर्यवंशी, अशोक शिंदे, महेंद्र निकुंभ ,स्वाती शिंदे, तन्मयी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नवी मुंबई मेट्रो मार्ग होतोय सुकर



॥ रेल्वे बोर्डाकडून रोलिंग स्टॉकची मंजुरी

॥ प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी।

सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या नवी मुंबई मेट्रोच्या रोलिंग स्टॉकची (कोच, इलेक्ट्रिकल इ.) रेल्वे बोर्डाकडून मंजुरी मिळाली आहे. नवी मुंबई मेट्रो कार्यान्वित करण्याचा दृष्टीने हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. नवी मुंबई मेट्रो कार्यान्वित होण्यासाठी आता केवळ स्थापत्य कामांसाठीचे पर्यवेक्षण बाकी आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबईतील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग विकसित करण्यात येत आहेत. त्यांपैकी मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर हा एकूण ११ कि.मी. लांबीचा, ११ स्थानकांसह तळोजा येथे आगार (डेपो) असणारा मार्ग आहे.

मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गाच्या अभियांत्रिकी सहाय्यासाठी सिडकोकतर्फे महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली होती. या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोच्या आतापर्यंत ऑसिलेशन, विद्युत सुरक्षा, इमर्जन्सी ब्रेक इ. महत्त्वाच्या चाचण्या यशस्वीरीत्या पार पडून त्या संदर्भातील प्रमाणपत्रही आरडीएसओकडून प्राप्त झाले आहे.

सीएमआरएस यांच्याकडून घेण्यात येणारी सुरक्षाविषयक चाचणी व त्यानंतर प्रदान करण्यात येणारे प्रमाणपत्र हे सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून व मेट्रो मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्याकरिता अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. सीएमआरएस यांच्या पथकाकडून १७ आणि १८ जानेवारी रोजी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक व संबंधित अधिकारी तसेच महा मेट्रोचे अधिकारी यांच्या उपस्थितीत मार्ग क्र.१ वर आणि तळोजा आगार येथे मेट्रोची सुरक्षाविषयक चाचणी घेण्यात आली होती. स्थापत्य कामांसाठीचे पर्यवेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, सीएमआरएस आणि रेल्वे मंडळ यांच्याकडून प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी हिरवा कंदील दाखवण्यात येणार आहे.

> नवी मुंबई मेट्रोचे स्थापत्यकामांसाठीचे पर्यवेक्षण पूर्ण झाल्यावर, नवी मुंबई मेट्रो, फेज १, लाईन १ कार्यान्वयन करण्यासाठी तयार होईल. आता नवी मुंबई मेट्रो प्रकल्प सुरू होण्याच्या अगदी शेवटच्या टप्प्यात आला आहे.
> -डॉ. संजय मुखर्जी
> उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको


## कृषीवल

### क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

**स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.**

- मुख्य संपादक






हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,
खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)
दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.
*(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)*
अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१**
**पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.**


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)